
# घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६

## (मराठी भाषांतर)



स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)
नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner

स्वच्छ महाराष्ट्र अभियान

सप्तपदी स्वच्छतेची

स्वच्छ भारत

एक पाऊल स्वच्छतेकडे

टीप :- सदरील पुस्तिका ही इंग्रजीतील नियमांचे स्वैर मराठी भाषांतर असल्याने मराठी पुस्तिका वाचताना मुळ इंग्रजी नियमांचा संदर्भ म्हणून वापर करावा.

# घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६

## (मराठी भाषांतर)

8 April 2016 रोजी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयातर्फे भारताचे राजपत्र असामान्य भाग २ Section 3 subsection (ii) मध्ये प्रकाशित Solid Waste Management Rules, 2016 चे मराठी भाषांतर

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)
नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


१) संक्षिप्त नांव व प्रारंभ १

२) व्याप्ती १

३) व्याख्या १

४) कचरा निर्मिती करणाऱ्यांची जबाबदारी ९

५) पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या ११

६) नागरी विकास मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या १२

७) खते विभाग तसेच रसायने व खते मंत्रालय यांच्या जबाबदाऱ्या १३

८) भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या १३

९) ऊर्जा मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या १४

१०) नवीन आणि अक्षय ऊर्जा स्त्रोत मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या १४

११) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या नगरविकास सचिवांच्या जबाबदाऱ्या १४

१२) जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी किंवा उपआयुक्त यांच्या जबाबदाऱ्या १६

१३) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या ग्रामपंचायत अथवा ग्रामविकास विभागाच्या सचिवांच्या जबाबदाऱ्या १७

१४) केंद्रीय पर्यावरण मंडळाच्या जबाबदाऱ्या १७

१५) स्थानिक प्राधिकारी संस्था तसेच जनगणना शहरे आणि समुह नगरांच्या ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या : स्थानिक संस्था आणि पंचायत यांनी १८

१६) राज्य प्रदूपण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समितीच्या जबाबदाऱ्या २४


Scanned by CamScanner

१७) सॅनिटरी नॅपकीन्स, डायपर्स यासारख्या वापरून फेकण्यासारख्या उत्पादनांच्या ब्रँडमालकांच्या जबाबदाऱ्या २६

१८) घन कचऱ्यावर आधारित कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याच्या त्याचप्रमाणे टाकाऊ वस्तूपासून इंधन प्रकल्पाच्या १०० किलो मीटर परिसरात असलेल्या उद्योग प्रकल्पांच्या जबाबदाऱ्या २७

१९) घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्राच्या स्थापनेच्या दृष्टिने जबाबदाऱ्यांचे निकष २७

२०) डोंगराळ क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टिने करावयाच्या कार्यवाहीचे निकष २८

२१) कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रक्रियेसाठी निकष २९

२२) कार्यवाहीसाठी कालबद्ध कार्यक्रम ३०

२३) राज्यस्तरीय सल्लागार समिती ३२

२४) वार्षिक अहवाल ३३

२५) अपघातासंबंधी अहवाल ३३

परिशिष्ट १ ३४

परिशिष्ट २ ४२

Scanned by CamScanner

# घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६

## १) संक्षिप्त नांव व प्रारंभ

१. हे नियम घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ या नावाने संबोधण्यात येतील.

२. अधिकृत राजपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या तारखेपासून हे नियम लागू होतील.

## २) व्याप्ती –

हे नियम प्रत्येक स्थानिक स्वराज संस्था, समुह स्वरूपातील शहराचा विस्तारित भाग, भारताचे महानिबंधक तथा जनगणना आयुक्त यांनी घोषित केलेले अधिसुचित क्षेत्र, अधिसूचित औद्योगिक वसाहती, भारतीय रेल्वेच्या नियंत्रणाखालील क्षेत्र, विमानतळ, हवाईतळ (airbase), बंदरे, संरक्षण विभागाच्या आस्थापना, विशेष आर्थिक क्षेत्र, राज्य व केंद्र शासनाच्या संस्था, धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन वेळोवेळी संबंधित राज्य सरकारने अधिसूचित केलेली धार्मिक व तीर्थस्थळे जिथे घनकचरा उत्पन्न होतो अशा संस्था, बाजारपेठा व इतर अनिवासी क्षेत्र यांना लागू असतील. औद्योगिक कचरा, घातक कचरा, घातक रसायने, जैव वैद्यकीय कचरा, E - कचरा, शिसेयुक्त (Lead) बॅटरीज, किरणोत्सर्गी कचरा यांच्यासाठी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत स्वतंत्र तरतूद असल्याने यास घनकचरा व्यवस्थापन कायदा, २०१६ मधून वगळण्यात आले आहे.

## ३. व्याख्या :–

(१.) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात

१. ''एरोबिक (वायुजिवी) सेंद्रिय खत'' (Aerobic) म्हणजे ऑक्सिजनच्या सहाय्याने सेंद्रिय पदार्थांचे सुक्ष्मजिवी विघटन करणारी नियंत्रित प्रक्रिया होय.



Scanned by CamScanner

२. ''अवायूजिवी पचनक्रिया'' (Anaerobic) म्हणजे ऑक्सिजनशिवाय सेंद्रिय पदार्थाचे सुक्ष्मजिवी विघटन करणारी नियंत्रित प्रक्रिया होय.

३. ''अधिकृतता'' म्हणजे घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी जबाबदार असलेल्या
यंत्रणेच्या अथवा स्थानिक नागरी संस्थेच्या चालकास राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समितीने प्रदान केलेली अनुमती होय.

४. ''जिवाणूंच्या सहाय्याने कुजवता येण्यासारखा कचरा'' म्हणजे कोणत्याही सेंद्रिय पदार्थांचे सुक्ष्म जिवाणूंच्या सहाय्याने अवनतीकरण करुन त्याचे अधिक सुलभ व स्थिर (stable) मिश्रणामध्ये रुपांतर करणे होय.

५. ''जैविक मिथेनीकरण'' (Bio-methanation) म्हणजे अशी एक प्रक्रिया ज्यामध्ये जैविक पदार्थांचे (enzyme) द्वारे विघटन करुन मिथेनयुक्त बायोगॅस तयार करण्यासाठी सुक्ष्मजीवी कृती केली जाते.

६. ''ब्रँड मालक'' म्हणजे अशी व्यक्ति किंवा कंपनी जी नोंदणीकृत ब्रँड लेबल असलेल्या उपयुक्त वस्तुंची विक्री करते.

७. ''आघात प्रतिबंधक'' (Buffer zone) म्हणजे त्या भोवतालचे अविकसीत क्षेत्र जिथे ५ टीपीडी क्षमतेपेक्षाही अधिक क्षमतेची घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा आहे. सदरील क्षेत्रामध्ये घनचकरा प्रक्रिया व विल्हेवाट सुविधेसाठी प्रदान करण्यात आलेल्या एकूण जागेमध्ये सदर क्षेत्र निश्चित केले जाईल.

८. ''मोठे कचरा निर्माते'' म्हणजे अशा इमारती जिथे केंद्र सरकारची विविध खाती अथवा पुरस्कृत विभाग, राज्य शासनाची विविध खाती अथवा पुरस्कृत विभाग, स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील पुरस्कृत विभाग अथवा खाजगी कंपन्या, रुग्णालये, सुश्रृषा विभाग, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे अथवा इतर शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, हॉटेल्स, व्यापारी आस्थापना, बाजारपेठा, प्रार्थना स्थळे, स्टेडियम व क्रीडा संकुले ज्यांची दैनंदिन कचरा निर्मिती १०० किलोपेक्षा अधिक आहे.

९. ''उपविधी'' म्हणजे अशी एक अधिसूचित नियामक चौकट जी स्थानिक स्वराज संस्था, जनगणना नगरे, अधिसुचित वसाहती यांच्या क्षेत्रात कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपयुक्त असते.

१०. ''जनगणना नगरे'' (Census towns) म्हणजे भारताच्या महानिबंधक अथवा जनगणना आयुक्तांनी परिभाषीत केलेले नागरी क्षेत्र.



११. ''ज्वलनशील कचरा'' म्हणजे अविघटनशील, पुनर्प्रक्रिया न होणारा, पुनर्वापर न करण्यासारखा, घातक नसलेला घनकचरा ज्याचे उष्मांक मुल्य १५०० किलो कॅलरी/किलो (1500 kcal/kg) पेक्षा जास्त आहे. आणि ज्यामध्ये फ्लोरीनेटेड पदार्थांसारख्या प्लॅस्टिक, लोकर, लगदा इत्यादींचा यामध्ये समावेश होत नाही.

१२. ''सेंद्रिय खत करणे'' (composting) म्हणजे सेंद्रिय पदार्थांचे सुक्ष्मजीवी विघटन करणारी नियंत्रित प्रक्रिया होय.

१३. ''ठेकेदार'' म्हणजे अशी व्यक्ति किंवा संस्था जी सेवा पुरविण्यासाठी किंवा सेवा पुरविणाऱ्या प्राधिकरणाकरीता काम करते तसेच साहित्य अथवा मजूरांचा पुरवठा करण्यासाठी ठेका स्विकारते.

१४. ''सहप्रक्रिया'' म्हणजे अविघटनशिल पुनःप्रक्रिया न करता येण्यासारखा कचरा, ज्याचे उष्मांकमूल्य १५०० किलो कॅलरीपेक्षा जास्त आहे, त्याचा वापर कच्च्या मालाच्या स्वरुपात किंवा इंधन स्त्रोंताच्या स्वरुपात, किंवा दोन्ही स्वरुपात औद्योगिक प्रक्रियांमध्ये पारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या जागी किंवा त्यांच्यासह करणे.

१५. ''विकेंद्रित प्रक्रिया'' म्हणजे अशा विकेंद्रित सुविधांची संस्थापना ज्यामुळे जास्तीत जास्त विघटनशील कचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि पुनर्प्रक्रिया योग्य साहित्य प्राप्त करणे शक्य होणार असून या सुविधा कचरानिर्मिती केंद्राच्या नजिक असल्याने कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी कमीत कमी वाहतूक करावी लागते.

१६. ''विल्हेवाट'' म्हणजे जमिनीखालील व जमिनीवरील पाणी तसेच सभोवतालची हवा दुषित होऊ नये म्हणून त्याचप्रमाणे जनावरे व पक्षी आकृष्ट होऊ नये म्हणून परिशिष्ठ १ मध्ये नमूद केल्यानुसार रस्ता झाडल्यानंतर जमा झालेला घनकचरा, प्रक्रियेनंतरचा उरलेला घनकचरा तसेच जमिनीवरील गटारातील गाळ यांची अंतिम व सुरक्षित विल्हेवाट.

१७. ''घरगुती घातक कचरा'' म्हणजेच रंगाचे निकामी डबे, जंतूनाशकांचे डबे, सी.एफ.एल.बल्ब, ट्युब लाईट, कालबाह्य औषधे, तुटलेली मर्क्युरी थर्मामीटर्स, वापरलेल्या बॅटरीज, वापरलेल्या सुया व सिरींजेस दुषित मलमपट्ट्या इत्यादी घरगुती स्वरूपाच्या वस्तू.

१८. ''घरोघरी जाऊन संकलित करणे'' म्हणजे प्रत्येक कुटुंब, दुकाने, व्यापारी संस्था, कार्यालये, संस्थात्मक अथवा अनिवासी क्षेत्र यांच्या प्रवेशद्वारापर्यंत जाऊन घनकचऱ्याचे संकलन करणे. यामध्ये गृहनिर्माण संस्था, बहुमजली संकुले यांचे



Scanned by CamScanner

प्रवेशद्वार अथवा घरकूल संकुलांच्या जमिनीलगतच्या मजल्या वरील ठरविलेल्या विशिष्ट ठिकाणापर्यंत जाऊन कचरा संकलित करणे याचा समावेश होतो.

१९. ''सुका कचरा'' म्हणजे अविघटनशील आणि रस्ता झाडल्यानंतरचा जड कचरा, या खेरीज पुनर्प्रक्रिया करण्यासारखा व न करण्यासारखा कचरा, ज्वलनशील कचरा, सॅनिटरी नॅपकीन्स आणि डायपर्स इत्यादींचा यामध्ये समावेश होतो.

२०. ''कचरा साठवण्याच्या जागा'' (Dump sites) म्हणजे असा भूभाग की जो स्थानिक स्वराज संस्थेतर्फे स्वच्छ भूभराव (Sanitary land fill) तत्त्वांचे पालन न करता घनकचरा विल्हेवाटीसाठी वापरला जातो.

२१. ''विस्तारित उत्पादकाच्या जबाबदाऱ्या'' (Extended Producer Responsibility EPR) म्हणजेच प्लॅस्टिक डबे, काचेचे तसेच पुठ्ठ्याचे बॉक्सेस इत्यादी सारख्या पॅकेजिंग उत्पादने बनविणारे उत्पादक हे त्यांच्या पॅकेजिंग उत्पादनांना त्यांच्या अस्तापर्यंत पर्यावरण पूरक ठेवणे संदर्भात जबाबदार आहेत.

२२. ''सुविधा'' म्हणजे अशी आस्थापना की जेथे घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने वर्गीकरण, पुनर्प्राप्ती, साठवणूक, संकलन, पुनर्प्रक्रिया, प्रक्रिया, संस्करण आणि सुरक्षित विल्हेवाट यासारख्या प्रक्रिया केल्या जातात.

२३. ''दंड'' म्हणजे अशी एक शिक्षा जी उपविधीनुसार कायद्यातील तरतुदींचे पालन न केल्याबद्दल कचरा निर्मिती करणारे, कचऱ्यावर प्रक्रिया करणारे आणि कचरा विल्हेवाट सुविधा पुरविणारे यांना केली जाते.

२४. ''फॉर्म'' म्हणजे या नियमांचे परिशिष्ट असेल.

२५. ''हाताळणे'' यामध्ये अशा सर्व कृती येतात की ज्या घनकचऱ्याच्या संदर्भात निवडणे, वर्गीकरण, पुनर्प्राप्ती, संकलन, दुय्यम साठवणूक, तुकडे करणे, गट्ठे बांधणे, भुगा करणे, चढवणे, उतरवणे, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यांच्याशी संबंधित आहेत.

२६. ''अप्रक्रिया जन्य'' (Inert) म्हणजे असा कचरा की जो विघटनशील व पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य नाही तसेच रस्ता झाडल्यानंतर ज्वलनशील नसलेला किंवा भूस्तरावरील गटारावरील धुळ आणि गाळ होय.

२७. ''भस्मीकरण'' (Incineration) म्हणजे अशी एक अभियांत्रिकी प्रक्रिया ज्यामध्ये ज्वालाग्रही घनकचऱ्याचे भट्टीमध्ये उच्च तपमानाला जाळून त्याला अवनत केले जाते.



२८. ''अनौपचारिक कचरा संकलक'' यामध्ये अशा व्यक्ति, संघटना अथवा कचरा विक्रेत्यांचा समावेश असतो की जे निवडणे, विक्री करणे आणि पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य साहित्याची खरेदी करणे यामध्ये सहभागी असतात. (भंगार गोळा करणारे/कबाडीवाले)

२९. ''निचरा'' (leachate) घनकचऱ्यामधून पाझरणारा असा द्रव ज्यामधे कचऱ्यामधुन निघालेले अथवा विरघळलेले घटक असतात.

३०. ''स्थानिक संस्था'' या कायद्याच्या संदर्भाने महानगरपालिका, नगर निगम, नगरपरिषद, नगरपालिका, नगरपालिका परिषद, नगर मंडळ, नगर पंचायत, शहर पंचायत, जनगणना नगरे, प्राधिकृत क्षेत्र, प्राधिकृत औद्योगिक वसाहती, ज्या की विविध राज्यात आणि केंद्रशासीत प्रदेशात विविध नावांनी ओळखल्या जातात अशांचा समावेश होतो.

३१. ''साहित्य पुन्हा प्राप्त करण्याची सुविधा'' (Materials Recovery Facility MRF) म्हणजे अशी एक सुविधा की स्थानिक संस्था किंवा नियम २ मध्ये उल्लेख केल्यानुसार अन्य संस्था, व्यक्ति, प्रतिनिधी यांनी अविघटनशील घनकचऱ्याची तात्पुरती साठवणूक करुन त्यावर प्रक्रिया करण्यापूर्वी अधिकृत अनौपचारिक कचरा संकलन करणारे विभाग, स्थानिक संस्था किंवा नियम २ मध्ये उल्लेख केल्यानुसार अन्य संस्थांनी अंगीकृत केलेले इतर कार्यगट यांचेसाठी कचऱ्याचे वर्गीकरण, निवडणे व पुनप्रक्रिया करता येण्याजोगे साहित्य वेगळे करण्यासाठीची सुविधा.

३२. ''अविघटनशील कचरा'' (Non biodegradable waste) म्हणजे असा कोणताही कचरा जो सुक्ष्मजीवी पद्धतीने अवनत करता येत नाही आणि सुलभ व स्थिर मिश्रणामध्ये रुपांतरीत करता येत नाही.

३३. '' सुविधा चालक'' (operator of a facility) म्हणजे अशी व्यक्ती अथवा अन्य संस्था जिच्याकडे स्थानिक संस्था अथवा स्थानिक संस्थेने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीकडील घनकचरा हाताळण्यासाठी स्वत:ची यंत्रणा आहे अथवा जो अशी यंत्रणा चालवतो.

३४. ''प्राथमिक संकलन'' म्हणजे प्रत्येक कुटुंब, दुकाने, कार्यालये आणि अन्य अनिवासी जागा अथवा स्थानिक संस्थेने निश्चित केलेल्या संकलन केंद्रापासून घनकचरा जमा करणे. उचलणे आणि वर्गीकरण केलेला घनकचरा काढून टाकणे याचा यामध्ये समावेश होतो.

३५. ''प्रक्रिया'' म्हणजे अशी एक वैज्ञानिक प्रक्रिया ज्यामुळे वर्गीकरण केलेल्या



Scanned by CamScanner

घनकचऱ्याची पुन:वापर, पुन:प्रक्रिया अथवा नवीन उत्पादनामध्ये रुपांतर यासाठी हाताळणी केली जाते.

३६. ''पुन:प्रक्रिया'' (Recycling) म्हणजे अशी एक प्रक्रिया की ज्यामध्ये वर्गीकृत आणि अविघटनशील घनकचऱ्याचे एका नवीन वस्तूंमध्ये अथवा नवीन उत्पादन बनविण्यासाठी कच्चा मालामध्ये रुपांतरण केले जाते. (अथवा एखाद्या मूळ उत्पादनाशी साम्य नसलेले नवीन उत्पादन बनविण्यासाठी कच्चा माल म्हणून वापरले जाते.) हे नवीन उत्पादन मूळ उत्पादनापेक्षा सारखे अथवा वेगळे असू शकते.

३७. ''पुनर्विकास'' म्हणजे जुन्या निवासी अथवा व्यापारी इमारतीची त्याच जागेवर पुनर्बांधणी करणे, जिथे सध्या अस्तित्वात असलेली इमारत व बांधकाम ढासळण्याच्या स्थितीत आहे.

३८. ''टाकाऊ वस्तूपासून प्राप्त इंधन'' (Refused Derived Fuel - RDF) म्हणजे क्लोरीनीकरण केलेल्या पदार्थाखेरीज प्लॅस्टिक, लाकूड, रांधा किंवा सेंद्रिय कचरा यासारख्या ज्वलनशील कचऱ्यापासून तसेच कचऱ्याच्या काही भागापासून प्राप्त केलेले इंधन.

३९. ''उरलेला घनकचरा'' म्हणजे असा कचरा की, घनकचऱ्यावरील प्रक्रियेनंतर जो पुनर्प्रक्रियेस किंवा पुढील कोणत्याही प्रक्रियेसाठी योग्य नाही असा टाकाऊ कचरा.

४०. ''स्वच्छता भूभराव'' (Sanitary Land Filling - SLF) म्हणजेच जमिनीतील व पृष्ठभागावरील पाणी, हवेत उडणारी धूळ, हवेत उडणारा कचरा, दुर्गंधी, घातक आग, जनावरे व पक्ष्यांचा उपद्रव, पाळीव प्राणी किंवा कुर्तडणारे प्राणी, हरितगृहातील गॅस उत्सर्जन, टिकून राहणाऱ्या सेंद्रिय प्रदुषकांमधील चढउतार आणि धूप यामुळे होणाऱ्या प्रदुषणाच्या बाबतीत प्रतिबंधक उपाययोजना करणाऱ्या अधिकृत सुविधेच्या ठिकाणी उरलेला घनकचरा आणि जमिनीवरील जड कचरा यांची अंतिम व सुरक्षित विल्हेवाट.

४१. ''सॅनिटरी टाकाऊ वस्तू'' यामध्ये वापरलेले डायपर्स, सॅनिटरी टॉवेल्स, नॅपकिन्स, कापसाच्या पट्ट्या, कंडोम्स, मलमूत्र विसर्जनासाठी वापरल्या जाणाऱ्या पट्ट्या व यासारख्या अन्य कचऱ्याचा समावेश असतो.

४२. ''अनुसूची'' म्हणजे या नियमांच्या परिशिष्टाची अनुसूची.

४३. ''दुय्यम साठवणूक'' (Secondary storage) म्हणजे घनकचरा संकलित केल्यानंतर प्रक्रियेसाठी अथवा विल्हेवाट लावण्यासाठी वाहतूक होण्याआधी दुय्यम साठवणूक केंद्र किंवा साहित्य पुन : प्राप्त करण्याची सुविधा (Material Recovery Facility) किंवा कचरा कुंड्यांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठेवणे.

४४. ''वर्गीकरण'' म्हणजे विघटनशील कचरा ज्यामध्ये शेतीविषयक तसेच दुग्ध व्यवसाय विषयक कचऱ्याचा समावेश आहे, अविघटनशील कचरा, पुनर्प्रक्रिया योग्य कचरा, पुनर्प्रक्रिया करण्यास अयोग्य कचरा, ज्वालाग्राही कचरा, सॅनिटरी कचरा, पुनर्प्रक्रियेस अयोग्य जड कचरा, घरगुती घातक कचरा, बांधकाम करताना तसेच बांधकाम पाडताना होणारा कचरा, अशा विविध प्रकारच्या घनकचरा निवडून त्याची स्वतंत्र साठवणूक करणे.

४५. ''सेवा पुरविणारा'' (Service provider) म्हणजे असे प्राधिकरण जे पाणी, मलनि:स्सारण, वीज, दूरध्वनी, रस्ते, गटारे यासारख्या सार्वजनिक उपयुक्ततेच्या सेवा पुरविते.

४६. ''घनकचरा'' म्हणजे यामध्ये घरगुती कचरा, सॅनिटरी कचरा, व्यापारी कचरा, संस्थात्मक कचरा, अन्न पुरवठा विषयक व बाजारातील कचरा, इतर अनिवासी कचरा रस्ता झाडल्यानंतरचा कचरा, गटारावरील काढलेला गाळ, उद्याने व फळभाज्या विषयक कचरा, शेती व दुग्धव्यवसाय विषयक कचरा प्रक्रिया केलेला जैव-वैद्यकीय कचरा, औद्योगिक कचरा वगळून जैव वैद्यकीय कचरा (Bio-Medical), बॅटरीचा कचरा, किरणोत्सर्गीत कचरा असा स्थानिक प्राधिकरण तसेच नियम २ मध्ये उल्लेख केल्यानुसार इतर संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेला घनकचरा होय.

४७. ''निवडणे'' (Sorting) म्हणजे कागद, प्लॅस्टिक, कार्ड बोर्ड (पुठ्ठा), धातू, काच यासारख्या कचऱ्यातील मिश्रीत वस्तू वेगळ्या करुन कचरा पुनर्प्रक्रियेसाठी योग्य बनविणे.

४८. ''स्थिर ठेवणे'' (Stabilising) म्हणजे विघटनशील कचऱ्याची अशी एक जैविक कुजवण्याची प्रक्रिया की जेथे हा कचरा निर्माण होतो तेथे निचरा होणार नाही (Leachate) किंवा तीव्र दुर्गंधी येणार नाही अशा पद्धतीने तो स्थिर ठेवला जातो तसेच शेतजमिनीसाठी, मातीची धुळ थांबवण्यासाठी आणि मातीस उपकारक ठरण्यास योग्य बनविला जातो.

४९. ''रस्त्यावरील विक्रेता'' (Street Vendor) (फेरीवाला) म्हणजे अशी कोणतीही व्यक्ति जी रस्त्यावर, गल्लीत, पायवाटेच्या बाजूला, पदपथावर, चालण्याच्या मार्गावर, उद्याने किंवा सार्वजनिक व खाजगी जागेवर तात्पुरत्या बांधलेल्या जागेत किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत विविध वस्तु, अन्नपदार्थ, जुन्या वस्तू व दैनंदिन वापराच्या वस्तू विकते. यामध्ये फेरीवाले, दारोदार जाऊन विक्री करणारे,





Scanned by CamScanner

कोणतीही परवानगी न घेता विक्री करणारे अशा स्थानिक अथवा प्रांतीय भाषेतील तत्सम संज्ञेनुसार विक्रेते यांचा समावेश होतो. 'रस्त्यावरील, विक्रेता' या शब्दाचा पारिभाषिक विविधतेनुसार, समजुतीनुसार आणि अभिव्यक्तिनुसार अर्थ लावला जातो.

५०. ''बिदागी शुल्क'' (Tipping fee) म्हणजे असे शुल्क किंवा आधार किंमत की जी कचऱ्यावरील प्रक्रिया सुविधा चालविण्याच्या अथवा भूभरावामध्ये उरलेल्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या चालकास अदा करण्यासाठी राज्य शासनाची प्राधिकृत अशी स्थानिक संस्था/प्रतिनिधी यांनी निश्चित केलेली असते.

५१. ''स्थलांतरण केंद्र'' (Transfer Station) म्हणजे अशी एक निर्माण केलेली सुविधा जेथे संकलीत केलेला घनकचरा प्राप्त करुन पुढील प्रक्रिया करण्यासाठी अथवा विल्हेवाट लावण्यासाठी बंदिस्त वाहनामधून अथवा कंटेनर्समधून वाहतूक केली जाते.

५२. ''वाहतूक'' (Transportation) म्हणजे संस्करण केलेल्या, अंशतः संस्करण केलेल्या व संस्करण न केलेल्या घनकचऱ्याची अशी वाहतूक की एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना पर्यावरणाच्या दृष्टिने योग्य ती काळजी घेऊन तसेच विशिष्ट पद्धतीने तयार केलेल्या बंदिस्त वाहतूक प्रणालीचा उपयोग करुन केली जाते. जेणेकरुन दुर्गंधी येणे, कचरा अस्ताव्यस्त सांडणे व ओंगळवाणी परिस्थिती निर्माण होणे टाळता येते.

५३. ''संस्करण'' (Processing) म्हणजे अशी एक तयार केलेली पद्धत, तंत्र अथवा प्रक्रिया की ज्यामुळे कोणत्याही कचऱ्याचे शारीरिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म बदलून त्याचे आकारमान व घातक मूल्य कमी केले जाते.

५४. ''उपभोक्ता शुल्क'' (User Fee) म्हणजे घनकचऱ्याचे संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी येणाऱ्या खर्चाची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करण्यासाठी स्थानिक संस्था अथवा नियम २ अंतर्गत अन्य संस्था यांनी कचरा निर्मिती करणाऱ्या कडून आकारलेले शुल्क होय.

५५. ''गांडूळखत'' (Vermi-Composting) म्हणजे गांडूळाचा उपयोग करून जीवाणूंच्या सहाय्याने कुजवण्या योग्य कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया.

५६. ''कचरा निर्माण करणारे'' (Waste Generator) म्हणजेच यामध्ये घनकचरा निर्माण करणारी प्रत्येक व्यक्ति, व्यक्तिंचा समुह, प्रत्येक निवासी परिसर, अनिवासी



आस्थापना ज्यामध्ये भारतीय रेल्वे, संरक्षण विभाग, यासारख्या आस्थापनांचा समावेश होतो.

५७. ''कचऱ्याची अधिश्रेणी'' (Waste Hierarchy) म्हणजे घनकचऱ्याचे व्यवस्थापन करताना प्रतिबंध, घट करणे, पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया, पुनर्प्राप्ती आणि विल्हेवाट या क्रमाने भर देऊन प्राधान्यक्रम निश्चित केला जातो. यामध्ये प्रतिबंध या बाबीस सर्वोच्च प्राधान्य असून भूभरावामध्ये विल्हेवाट लावणे यास अत्यंत कमी प्राधान्य आहे.

५८. ''कचरा उचलणारे'' (Waste Picker) (भंगारवाले/कबाडीवाले) म्हणजे अशी व्यक्ति किंवा व्यक्तिंचा समुह जो अनौपचारिकरित्या रस्त्यावरील, कचरा कुंडीतील, साहित्य पुनर्प्राप्ती सुविधा (MRF), प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा अशा ठिकाणाहून पुनर्वापर अथवा पुनर्प्रक्रिया करण्यासारख्या घनकचऱ्याचे संकलन करून आपल्या उपजिविकेसाठी हा कचरा पुनर्प्रक्रिया करणाऱ्यांना अथवा मध्यस्थांना विकतात.

(२.) या ठिकाणी वापरलेल्या ज्या शब्दांची अभिव्यक्तिंची व्याख्या केलेली नाही त्यांची व्याख्या पर्यावरण सुरक्षा अधिनियम १९८६, जल (पर्यावरण प्रतिबंधक आणि नियंत्रण) अधिनियम १९७४, जल (पर्यावरण प्रतिबंधक व नियंत्रण) उपकर अधिनियम १९७७ आणि वायू पर्यावरण प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम १९८१ यामध्ये केलेली असून या संबंधित कायद्यामध्ये जो अर्थ दिला आहे तोच अर्थ अशा शब्दाना अभिप्रेत आहे.

## ४) कचरा निर्मिती करणाऱ्यांची जबाबदारी :-

१) प्रत्येक कचरा निर्मिती करणाऱ्याने

ए) त्यांच्याकडे जमा झालेल्या कचऱ्याचे विघटनशील, अविघटनशील आणि घरगुती ज्वालाग्रही कचरा अशा तीन भागात वर्गीकरण करुन तीन स्वतंत्र कचराकुंड्यामध्ये (Dust bins) ठेवावा आणि स्थानिक संस्थेने अधिसुचित केल्यानुसार अधिकृत कचरा उचलणाऱ्या व्यक्ति अथवा संकलक यांच्याकडे सुपुर्द करावा.

बी) वापरलेले डायपर्स, सॅनिटरी पॅडस् इत्यादी उत्पादकांनी अथवा ब्रँडधारकांनी सोबत पुरविलेल्या पाऊच (पिशवी) मध्ये बंदिस्त करुन तसेच त्याला सुरक्षित वेष्टन करुन स्थानिक संस्थेने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार कोरडा कचरा अथवा अविघटनशील कचराकुंडीजवळ ठेवावे.



Scanned by CamScanner

सी) बांधकामाच्या वेळी अथवा जुने बांधकाम पाडताना जमा झालेला राडारोडा (कचरा) आपल्या जागेत ठेवलेला असेल तर त्याची विल्हेवाट बांधकाम आणि जुने बांधकाम पाडणे कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या अधिनियमानुसार लावावी आणि

डी) फळे व भाजीपाला त्याचप्रमाणे उद्यानातील जमा झालेला कचरा स्वतःच्या जागेत स्वतंत्रपणे ठेऊन स्थानिक संस्थेने वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार त्याची विल्हेवाट लावावी.

२) कचरा निर्माण करणाऱ्या कुणीही घनकचरा रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर, आपल्या जागेच्या बाहेर अथवा गटारात किंवा पाणी साठ्याच्या ठिकाणी फेकू नये, जाळू नये अथवा गाडू नये.

३) स्थानिक संस्थेने आपल्या उपविधीमध्ये निश्चित केल्यानुसार सर्व कचरा निर्माण करणाऱ्यांनी घनकचरा व्यवस्थापनासाठी उपभोक्ता शुल्क अदा करावे.

४) स्थानिक संस्थेस किमान कामकाजाचे तीन दिवस अगोदर पूर्वसूचना दिल्याखेरीज कुणीही परवाना नसलेल्या ठिकाणी शंभरहून अधिक लोकांचा सहभाग असलेला मेळावा अथवा कार्यक्रम आयोजित करू नये. कार्यक्रम आयोजित करणारी व्यक्ति किंवा संघटना यांनी कचऱ्याचे वर्गीकरण करुन वर्गीकृत कचरा स्थानिक संस्थेने निश्चित केलेल्या कचरा संकलक अथवा प्रतिनिधीस हस्तांतरीत करण्याबाबत हमी द्यावी.

५) रस्त्यावरील प्रत्येक विक्रेत्याने त्याच्या कामाच्या ठिकाणी होणारा कचरा साठविण्यासाठी आवश्यक कचराकुंड्या ठेवाव्यात. ज्यामध्ये अन्नपदार्थाचा कचरा, विल्हेवाट लावण्यायोग्य प्लेटस्, कपस्, कॅन, रॅपर्स, नारळाच्या करंट्या, शिल्लक अन्न, भाजीपाला, फळे इत्यादींचा समावेश असेल. हा साठलेला कचरा स्थानिक संस्थेने निश्चित केलेल्या कचरा डेपोमध्ये किंवा कचरा वाहून नेणाऱ्या वाहनामध्ये देण्यात यावा.

६) ही अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत सर्व निवासी व बाजार संघटनांनी स्थानिक संस्थेच्या सहभागाने अधिनियमात नमूद केल्यानुसार कचरा निर्मितीच्या ठिकाणी वर्गीकरण केलेला कचरा स्वतंत्रपणे ठेवावा. पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य वस्तू एकतर कचरा उचलणाऱ्या अधिकृत व्यक्तिंना द्याव्यात किंवा पुनर्प्रक्रिया करणाऱ्या अधिकृत संस्थेस द्याव्यात. जैविकरित्या कुजवण्यायोग्य कचऱ्यावर संस्थेच्या आवारातच प्रक्रिया करावी, संस्करण करावे आणि त्याचे खत



तयार करून अथवा जैविक मिथेनिकरण करून विल्हेवाट लावावी. उरलेला घनकचरा स्थानिक संस्थेच्या अधिकृत कचरा संकलकास अथवा त्याच्या प्रतिनिधी संस्थेस द्यावा.

७) ही अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एका वर्षाच्या आत सर्व संघटित समुदाय आणि संस्था ज्यांचे क्षेत्र ५ हजार चौरस मिटरहून अधिक आहे त्यांनी स्थानिक संस्थेच्या सहभागाने कचरा निर्मितीच्या ठिकाणी वर्गीकरण केलेला कचरा स्वतंत्रपणे ठेवावा. पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य वस्तू एक तर कचरा उचलणाऱ्या अधिकृत व्यक्तिंना द्याव्यात किंवा पुनर्प्रक्रिया करणाऱ्या अधिकृत संस्थेस द्याव्यात. जैविकरित्या कुजवण्या योग्य कचऱ्यावर संस्थेच्या आवारात जागीच प्रक्रिया करावी. संस्करण करावे आणि त्याचे खत तयार करून अथवा जैविक मिथेनिकरण करून विल्हेवाट लावावी. उरलेला घनकचरा स्थानिक अधिकृत संकलकास अथवा त्याच्या प्रतिनिधी संस्थेस द्यावा.

८) सर्व हॉटेल्स् आणि उपहार गृहे यांनी ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत स्थानिक संस्थेच्या सहभागाने कचरा निर्मितीच्या ठिकाणी वर्गीकरण केलेला कचरा स्वतंत्रपणे ठेवावा. पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य वस्तू एक तर कचरा उचलणाऱ्या अधिकृत व्यक्तिस द्याव्यात किंवा पुर्नप्रक्रिया करणाऱ्या अधिकृत संस्थेस द्याव्यात. जैविकरित्या कुजवण्या योग्य कचऱ्यावर हॉटेल अथवा उपहार गृहाच्या आवारात जागीच प्रक्रिया करावी. संस्करण करावे आणि त्याचे खत तयार करून अथवा जैविक मिथेनीकरण करून विल्हेवाट लावावी. उरलेला घनकचरा स्थानिक संस्थेच्या अधिकृत संकलकास अथवा त्याच्या प्रतिनिधीस द्यावा.

## ५) पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या (Ministry of environment forest and climate change) :-

१) सदरील अधिनियमांची संपूर्ण देशात अंमलबजावणी करणे आणि सनियंत्रण ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी पर्यावरण, वन आणि हवामानातील बदल या मंत्रालयाची राहिल. या संदर्भात एक केंद्रीय सनियंत्रण समितीचे गठन करण्यात यावे. ही समिती पर्यावरण, वन आणि हवामानातील बदल या मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली असेल. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाचे समितीतील सहभागी अधिकारी किंवा खालील विभागाचे सल्लागार हे सहसचिवापेक्षा कमी दर्जाचे नसतील.



Scanned by CamScanner

१) नगरविकास मंत्रालय
२) ग्राम विकास मंत्रालय
३) रसायने व खत उत्पादन मंत्रालय
४) कृषि मंत्रालय
५) केंद्रिय पर्यावरण नियंत्रण मंडळ
६) तीन राज्यांची पर्यावरण नियंत्रण मंडळे अथवा पर्यावरण नियंत्रण समित्यांना चक्राकार पद्धतीने प्रतिनिधीत्व.
७) तीन राज्यांची नगर विकास मंत्रालये चक्राकार पद्धतीने
८) तीन राज्यांची ग्रामीण विकास मंत्रालये चक्राकार पद्धतीने
९) तीन स्थानिक संस्था चक्राकार पद्धतीने
१०) दोन जनगणना शहरे चक्राकार पद्धतीने
११) एफ.आय.सी.सी.आय., सी.आय.आय (FICCI CII)
१२) दोन विषयतज्ञ

२) सदरील अधिनियमांच्या संनियंत्रण व अंमल बजावणीसाठी केंद्रिय संनियंत्रण समितीची वर्षातून किमान एक बैठक होईल. आवश्यकता भासल्यास पर्यावरण, वन आणि वायू परिवर्तन मंत्रालय इतर तज्ञांच्या समितीमध्ये समावेश करू शकेल. दर तीन वर्षांनी समितीची पुनर्रचना करण्यात येईल.

## ६) नागरी विकास मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या (Ministry of Urban Development, Now MOHUA):-

१) नागरी विकास मंत्रालय खालील कामांच्या संदर्भात राज्य सरकारे आणि केंद्र शासित प्रदेश यांच्याशी समन्वय ठेवेल.

अ) मंत्रालय तसेच इतर बाह्यसंस्थांच्या मदतीने जे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविले जातात त्यांची अंमलबजावणी त्याचप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विकसीत करण्यासाठी राज्ये आणि स्थानिक संस्था यांनी योजलेल्या उपाययोजना यासबंधी किमान वर्षातून एकदा आढावा घेऊन सुधारणा करण्याच्या दृष्टिने सल्ला देणे.

ब) ही अधिसूचना जाहिर झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत घनकचरा व्यवस्थापन ज्यामध्ये कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीचा समावेश असेल यासंबंधी विविध भागीदार विभागांच्या सहसंमतीने राष्ट्रीय धोरण आणि कार्यपद्धती तयार करणे.

क) राष्ट्रीय घनकचरा व्यवस्थापन धोरण आणि राष्ट्रीय नागरी स्वच्छता धोरण यावर



आधारीत राज्य व केंद्रशासित प्रदेशांनी राज्याचे धोरण ठरविण्याच्या संदर्भात राज्यांना मदत करणे.

ड) घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात संशोधन आणि विकास यांना उत्तेजन देणे, राज्य सरकारे आणि स्थानिक संस्था यांच्यापर्यंत माहिती पोचविणे.

इ) स्थानिक संस्था त्याचप्रमाणे इतर सहभागी संस्थांसाठी क्षमता संवर्धन व प्रशिक्षण आयोजित करणे.

फ) राज्यांना आणि केंद्र शासीत प्रदेशांना घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात बैठका, कालबद्ध कार्यक्रम आणि दर्जा राखणे यासाठी निधी आणि तांत्रिक मार्गदर्शक सूचना पुरविणे.

## ७) खते विभाग तसेच रसायने व खते मंत्रालय यांच्या जबाबदाऱ्या (Department of Fertilizers, Ministry of Chemicals and fertilizers):-

खते विभागाने उचित यंत्रणेच्या माध्यमातून

अ) शहरातील खतांच्या संदर्भात विक्रीस चालना देण्यासाठी सहाय्य करणे.

ब) रासायनिक खतांच्या ६ ते ७ थैल्यांसोबत कंपोस्ट खताच्या ३ ते ४ थैल्या या प्रमाणात सह विक्रीस खत उत्पादन कंपन्यांना प्रोत्साहन देणे व त्या मर्यादेत विक्रीसाठी कंपोस्ट उपलब्ध होईल याची सुनिश्चिती करणे.

## ८) भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या (Ministry of agriculture):-

कृषि मंत्रालय उचित पद्धतीचा अवलंब करून

अ) कंपोस्ट खतांचे उत्पादन आणि विक्रीच्या संदर्भात खत नियंत्रण आदेशामध्ये लवचिकता ठेवणे.

ब) शेतजमिनीवर कंपोस्ट खतांचा वापर होण्याच्या दृष्टिने प्रचार करणे.

क) स्थानिक प्राधिकरण किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उत्पादित केलेल्या कंपोस्ट खतांची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोगशाळा स्थापन करणे.

ड) कंपोस्ट खतांची गुणवत्ता कायम ठेवणे तसेच शेत जमिनीमध्ये कंपोस्ट आणि रासायनिक खतांच्या वापराचे प्रमाण निश्चित करणे याबाबतीत आवश्यक मार्गदर्शक सूचना देणे.



Scanned by CamScanner

## ९) ऊर्जा मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या (Ministry of Power) :-

ऊर्जा मंत्रालयाने उचित पद्धतीचा अवलंब करून

अ) घनकचऱ्यापासून निर्माण करण्यात आलेल्या उर्जेचे दरपत्रक अथवा शुल्क निश्चित करणे.

ब) कचऱ्यापासून निर्माण झालेली वीज खरेदी करण्याबाबत वितरण कंपन्यांना बंधनकारक करणे.

## १०) नवीन आणि अक्षय ऊर्जा स्त्रोत मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या (Ministry of new and renewable energy sources ) :-

नवीन आणि अक्षय उर्जा स्त्रोत मंत्रालय उचित पद्धतीचा अवलंब करून

अ) कचऱ्यापासून वीज निर्मिती करणाऱ्या संचांना पायाभूत सुविधा उपलब्ध होण्यास मदत करणे.

ब) अशा कचऱ्यापासून वीज निर्मिती करणाऱ्या संचांना प्रोत्साहनपर सहाय्य अथवा आवश्यक अनुदान उपलब्ध करून देणे.

## ११) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या नगरविकास सचिवांच्या जबाबदाऱ्या :-

राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या नगरविकास सचिवांनी आयुक्त, महानगरपालिका किंवा संचालक नगरपालिका प्रशासन किंवा स्थानिक संस्थांचे संचालक यांच्या माध्यमातून

अ) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये कचरा उचलणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी गट आणि क्षेत्रीय स्तरावर सहमतीने घनकचरा व्यवस्थापनासंबंधी धोरण आणि कार्यपद्धती तयार करावी. हे धोरण व कार्यपद्धती सदरील नियम घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचे केंद्रीय धोरण, नगरविकास मंत्रालयाचे राष्ट्रीय नगर स्वच्छता धोरण यांच्याशी सुसंगत असावे.

राज्यांचे धोरण व कार्यपद्धती हे अधिनियम प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्ष कालावधीपूर्वी निश्चित करावी. (म्हणजेच एक वर्षापेक्षा अधिक कालावधी होता कामा नये.)

ब) घनकचरा व्यवस्थापनासंबंधी राज्याचे धोरण व कार्यपद्धती निश्चित करताना कचऱ्याचे प्रमाण कमी करणे, पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया, पुनर्प्राप्ती त्यातील विविध



घटकांचा सर्वाधिक उपयोग करणे त्याचबरोबर भूभरावामध्ये कमीत कमी कचरा जाईल आणि मानवी आरोग्य आणि पर्यावरण याला बाधा पोचणार नाही या दृष्टिने भर देण्यात यावा.

क) कचरा उचलणारे, कचरा संकलक, पुनर्प्रक्रिया उद्योग यासारख्या अनौपचारिक विभागांची कचरा कमी करणाऱ्या संदर्भातील प्राथमिक भूमिकेची राज्याचे धोरण व कार्यपद्धती यामध्ये योग्य ती दखल घेण्यात यावी. तसेच कचरा उचलणारे व कचरा संकलक यांचा घनकचरा व्यवस्थापनामध्ये अंतर्भाव होण्याच्या दृष्टिने ढोबळ मार्गदर्शक सूचनांचा समावेश असावा.

ड) सर्व स्थानिक संस्थातर्फे या अधिनियमांची अंमलबजावणी केली जाईल याबाबत सुनिश्चित करावे.

ई) शहराचा बृहत आराखडा तयार करताना त्यामध्ये घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट याबाबत प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचा नगर नियोजन विभागातर्फे तरतूद करण्यात येईल याची सुनिश्चिती करावी. जी शहरे सांघिक प्रक्रिया सुविधा अथवा शहर गटांसाठी असलेल्या प्रादेशिक भूभराव स्वच्छता सुविधेचे सदस्य आहेत अशी शहरे खेरीज इतर सर्व शहरांसाठी तरतूद आवश्यक आहे.

फ) एक वर्षाच्या आत स्थानिक संस्थांना घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधेसाठी आवश्यक जागा निश्चित झाल्याची व तिचे वाटप झाल्याची खात्री करणे तसेच स्थानिक संस्थांना राज्याच्या बृहत् आराखड्यामध्ये (भू वापर आराखडा) काही शहरांच्या बाबतीत महानगर अथवा जिल्हा नियोजन समिती अथवा शहरे व लगतच्या ग्रामीण भागाच्या नियोजन विभागामार्फत समाविष्ट केल्याची खात्री करणे.

ग) गृह संकुल, व्यापारी संकुल अथवा अन्य अनिवासी संकुल जिथे २०० हून अधिक निवासस्थाने किंवा ५ हजार चौरस मिटरपेक्षा अधिक क्षेत्राचे भूपट्टे आहेत अशा ठिकाणी घनकचऱ्याचे वर्गीकरण, साठवण, विकेंद्रित प्रक्रिया यासाठी आवश्यक त्या स्वतंत्र जागेची तरतूद विकास आराखड्यामध्ये करण्याबाबत राज्याच्या नगर विकास विभागास आणि स्थानिक संस्थांना सूचना देणे.

ह) पुनर्प्राप्ती व पुनर्प्रक्रिया सुविधेसाठी एकूण क्षेत्राच्या किमान ५ टक्के किंवा एकूण भू पट्ट्यापैकी ५ भूपट्टे अथवा शेडस् राखीव ठेवण्याबाबत विशेष आर्थिक क्षेत्राचे विकसक, औद्योगिक वसाहती आणि उद्योग नगरांना सूचना देणे.



Scanned by CamScanner

ज) खर्चाची विभागणी करण्याच्या तत्त्वावर अस्तित्त्वात असलेल्या प्रादेशिक सुविधा केंद्राचा ५० कि.मी. किंवा त्याहून अधिक अंतरावर असलेल्या नगरे अथवा गट शहरे यांच्यासाठी 'सामुहिक प्रादेशिक स्वच्छता भूभराव आस्थापना' (Common Regional Sanitary Land Fill) उपलब्ध करुन देणे तसेच अशा स्वच्छता भूभरावासाठी व्यावसायिक व्यवस्थापन यंत्रणा उपलब्ध होण्याबाबत सुनिश्चिती करणे.

क) स्थानिक संस्थासाठी घनकचरा व्यवस्थापन, वर्गीकरण, वाहतूक अथवा जागीच प्रक्रिया करण्याकरिता क्षमता संवर्धन करणे.

ल) राज्याच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सहमतीने दररोज ५ टनापेक्षा अधिक घनकचऱ्याच्या प्रक्रियेसाठी आणि विल्हेवाट सुविधेसाठी बफर क्षेत्र (Buffer Zone) अधिसूचित करणे.

म) कचरा उचलणारे आणि कचरा विक्रेते यांच्यासाठी नावनोंदणी योजना सुरू करणे.

## १२) जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी किंवा उपआयुक्त यांच्या जबाबदाऱ्या :-

जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी किंवा उपआयुक्त यांनी

अ) सदरील अधिनियम प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत राज्याच्या नगर विकास सचिवांशी प्रभावी समन्वय साधून स्थानिक संस्थांना घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अधिनियम ११ च्या पोटकलम एफ नुसार योग्य जागा शोधून ताब्यात देण्याची कार्यवाही करावी.

ब) कचरा वर्गीकरण, प्रक्रिया, संस्करण आणि विल्हेवाट या संदर्भात स्थानिक संस्थांच्या कार्याचा किमान त्रैमासिक आढावा घ्यावा. तसेच नगरविकास विभागाचे सचिव, आयुक्त, नगरपरिषद प्रशासनाचे संचालक किंवा स्थानिक संस्थांचे संचालक यांच्या सहमतीने योग्य त्या सुधारणा कराव्यात.



## १३) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या ग्रामपंचायत अथवा ग्रामविकास विभागाच्या सचिवांच्या जबाबदाऱ्या :-

१) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या नगर विकास सचिवांच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्याच पद्धतीच्या जबाबदाऱ्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या ग्रामपंचायत अथवा ग्रामविकास सचिवांच्या असतील. या जबाबदाऱ्या सदरील अधिनियमानुसार त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी असतील.

## १४) केंद्रीय पर्यावरण मंडळाच्या (Central Pollution Control Board) जबाबदाऱ्या:-

केंद्रीय पर्यावरण मंडळाने

अ) स्थानिक संस्थांनी निश्चित केलेल्या मानकांच्या अधिन राहून सदरील अधिनियमांची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व प्रदुषण नियंत्रण समित्या यांच्याशी समन्वय ठेवणे.

ब) भूगर्भातील (जमिनीखालील) पाणी, सभोवतालची हवा, ध्वनिप्रदुषण, सर्व प्रकारच्या घनकचऱ्याच्या प्रक्रिया आणि विल्हेवाट यावेळी होणारा निचरा या संदर्भात मानके निश्चित करणे.

क) घनकचरा प्रक्रिया सुविधा आणि संस्करण तंत्रज्ञान या संदर्भात पर्यावरण मानके आणि निकष यांचा आढावा घेणे आणि वेळोवेळी गरजेनुरूप अद्यावत करणे.

ड) घनकचरा व्यवस्थापन सुविधा किंवा संस्करण तंत्रज्ञान तसेच संनियंत्रण होत असलेल्या बाबीसंबंधी संकलीत केलेली माहिती आणि विहित पर्यावरण मानकांची अंमलबजावणी या बाबतीत राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समिती यांचा वर्षातून किमान एकदा आढावा घेणे.

इ) घनकचरा कचऱ्यावरील प्रक्रिया, पुनर्प्रक्रिया, संस्करण या संदर्भात कोणत्याही नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या बाबतीत राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे पुनर्विलोकन करणे तसेच विहित कामकाजाची मानके, उत्सर्जन निकष ६ महिन्याच्या आत निश्चित करणे.

फ) स्थानिक संस्थातर्फे या अधिनियमांच्या होणाऱ्या अंमलबजावणीच्या संदर्भात प्रदुषण नियंत्रण मंडळ व प्रदुषण नियंत्रण समित्या यांच्या माध्यमातून संनियंत्रण करणे.



Scanned by CamScanner

ग) राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ व प्रदुषण नियंत्रण समिती यांच्याकडून सदरील अधिनियमांच्या अंमलबजावणीच्या बाबतीत प्राप्त अहवालाच्या आधारे वार्षिक अहवाल पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयास सादर करणे तसेच तो पब्लिक डोमेनवर ठेवणे.

ह) दररोज ५ टनाहून अधिक घनकचरा हाताळणाऱ्या विविध आकाराच्या कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधांच्या बाह्यसिमेलगत निवासी, व्यापारी अथवा अन्य कोणतेही बांधकामास मर्यादा घालण्याच्या दृष्टिने बफर क्षेत्र कायम ठेवण्यासाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करणे.

ई) या अधिनियमातील तरतूदींच्या अधिन राहून स्थानिक संस्थांना पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट लावणे सोयीचे व्हावे यासाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करणे.

ज) कचऱ्याच्या आंतर राज्य देवाण घेवाणीच्या दृष्टिने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करणे.

## १५) स्थानिक प्राधिकारी संस्था तसेच जनगणना शहरे आणि समुह नगरांच्या ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या : स्थानिक संस्था आणि पंचायत यांनी –

अे) राज्याचे धोरण आणि कार्यपद्धती अधिसूचित झाल्यापासून सहा महिन्याच्या आत घनकचरा धोरण व कार्यपद्धतीस अनुसरून घनकचरा व्यवस्थापन कृतीयोजना आराखडा तयार करणे आणि संबंधित राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाच्या आवश्यक प्रशासकीय विभागाना त्याचप्रमाणे राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या अधिकृत प्रतिनिधी संस्था यांना सादर करणे.

बी) झोपडपट्ट्या, अनौपचारिक वस्त्या, व्यापारी, संस्थात्मक आणि इतर अनिवासी क्षेत्र येथील सर्व कुटुंबाकडील वर्गीकरण केलेला घनकचरा घरोघरी जाऊन संकलित करणे. बहुमजली इमारती, भव्य व्यापारी संकुले, मॉल्स, गृह संकुले इत्यादींच्या प्रवेशद्वाराजवळील निश्चित केलेल्या जागेवरून कचरा संकलीत करणे.

सी) कचरा उचलणाऱ्या लोकांच्या संघटना किंवा अनौपचारिक कचरा संकलक यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रणाली निश्चित करणे तसेच अधिकृत कचरा उचलणारे आणि कचरा संकलक यानी घरोघरी जाऊन कचरा जमा करण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापनामध्ये त्यांचा आंतर्भाव करण्यासाठी प्रणाली निश्चित करणे.



डी) स्वयंसेवी गटांची स्थापना करून घेऊन त्यांना ओळखपत्रे पुरविणे आणि त्यानंतर घरोघरी जाऊन कचरा जमा करण्यासह घनकचरा व्यवस्थापनामध्ये त्यांचा आंतर्भाव करणे.

ई) सदरील अधिनियमांची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून उपविधी तयार करणे व त्यांची कालबद्ध अंमलबजावणी होण्याबाबत सुनिश्चिती करणे.

एफ) वेळोवेळी योग्य ते उपभोक्ता शुल्क ठरविणे आणि कचरा निर्मिती करणाऱ्यांकडून स्वत: अथवा प्रतिनिधी संस्थेमार्फत वसूल करणे.

जी) कागद, पाण्याच्या बाटल्या, मद्याच्या बाटल्या, शीतपेयाची कॅन्स, टेट्रापॅक्स, फळांची साले, वेष्टने इत्यादी कचरा रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी, गटाराच्या ठिकाणी न फेकणे अथवा न जाळणे याबाबत कचरा निर्मिती करणाऱ्यांना सूचना देणे. तसेच कचरा निर्मितीच्या जागी त्याचे नियमानुसार विहित पद्धतीने वर्गीकरण करुन स्थानिक संस्थेचे अधिकृत केलेल्या कचरा उचलणाऱ्या व्यक्ति अथवा कचरा संकलक यांच्याकडे देण्याबाबत सूचना देणे.

एच) पेपर, प्लॅस्टिक, लोखंड, काच, कपडा यासारख्या वर्गीकरण केलेला व पुर्नप्रक्रिया करण्यायोग्य कचरा अनोपचारिक अथवा अधिकृत कचरा उचलणारे आणि पुनर्प्रक्रिया करणारे यांना घेणे सहज शक्य व्हावे म्हणून साहित्य पुनर्प्राप्ती सुविधा किंवा दुय्यम साठवणूक सुविधा पुरेशा जागेसह स्थापीत करणे. जैविक विघटनशील कचरा साठविण्यासाठी ठेवलेल्या कचराकुंड्या हिरव्या रंगाने, पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य कचरा साठविण्याच्या कचराकुंड्या पांढऱ्या रंगाने आणि इतर कचरा साठविण्याच्या कचराकुंड्या काळ्या रंगाने रंगविणे.

आय) घरगुती घातक कचरा साठविण्यासाठी साठवणूक केंद्रे स्थापन करून घरगुती घातक कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्याच्या दृष्टिने असा कचरा साठवणूक केंद्रामध्येच जमा करण्याबाबत कचरा निर्मिती करणाऱ्यांना सूचना देणे. २० चौरस किलोमीटर (Sq. Km) अथवा त्याचा भाग असलेल्या क्षेत्रासाठी एक साठवणूक केंद्र अशा पद्धतीने शहर अथवा



Scanned by CamScanner

नगरामध्ये स्थापीत करुन या केंद्रात घरगुती विघातक कचरा जमा करण्याच्या वेळा निश्चित करुन त्यासंबंधी अधिसूचना जाहिर करणे.

जे) राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी सुचित केल्यानुसार घातक कचरा विल्हेवाट सुविधेच्या ठिकाणी अशा घरगुती विघातक कचऱ्याच्या साठवणूक व वाहतूक यांच्या सुरक्षिततेबाबतीत मानके सुनिश्चिती करणे.

के) रस्ता झाडताना जमा झालेली झाडाची पाने न जाळण्याबाबत तसेच ती स्थानिक संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधी संस्थेस अथवा कचरा संकलकाकडे देण्यासंबंधी रस्ता सफाई कामगारांना सूचना देणे.

एल) कचरा उचलणारे आणि कचरा संकलक यांना घनकचरा व्यवस्थापनासंबंधी प्रशिक्षण देणे.

एम) भाजीपाला, फळे, फुले, मांस, कोंबडी व मच्छी बाजार येथील कचरा रोजच्या रोज संकलीत करणे. तसेच बाजारपेठांच्या आसपास आरोग्यास घातक ठरणार नाही अशा दृष्टिने विकेंद्रित खत निर्मिती केंद्र किंवा जैविक मिथेनीकरण केंद्र स्थापन करण्याबाबत उत्तेजन देणे.

एन) लोकसंख्येची घनता, व्यापारी उलाढाल आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन रोजच्या रोज, एक दिवसा आड किंवा आठवड्यातून दोन वेळा अशा पद्धतीने रस्ते, गल्ल्या आणि उप गल्ल्या झाडल्यानंतर होणारा कचरा वर्गीकृत पद्धतीने जमा करणे.

ओ) रस्त्यावरील झाडलेला कचरा तसेच गटारातील गाळ या सारखा कचरा जिथे थेट वाहतूक करण्यासाठी पाठविणे सोयीचे नाही अशा कचऱ्याच्या तात्पुरत्या साठवणुकीसाठी आच्छादीत दुय्यम साठवणूक सुविधा स्थापित करणे. स्थानिक स्वराज्य संस्थेने निश्चित केल्यानुसार साठवलेल्या या कचऱ्याची नियमीतपणे विल्हेवाट लावणे.

पी) फुलबाग, उद्याने आणि उपवने येथील कचरा स्वतंत्रपणे संकलीत करुन शक्यतो उद्याने व उपवने यांच्या ठिकाणीच त्यावर प्रक्रिया करणे.

क्यु) वर्गीकरण केलेल्या कचऱ्याची मिश्रण केंद्र, जैविक मिथेनिकरण केंद्र अथवा अशा अन्न सुविधापर्यंत प्रक्रियेसाठी वाहतूक करणे. शक्यतो जागेवरच प्रक्रिया करण्यास प्राधान्य देण्यात येईल.



आर) अविघटनशील कचऱ्याची संबंधित प्रक्रिया सुविधा, साहित्य, पुनर्प्राप्ती सुविधा किंवा दुय्यम साठवणूक सुविधा केंद्रापर्यंत वाहतूक करणे.

एस) बांधकाम करताना व जुने बांधकाम पाडताना होणाऱ्या कचऱ्याची वाहतूक यासंबंधी बांधकामे आणि पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम २०१६. (construction and demolition waste rules 2016) यांचे पालन करणे.

टी) घनकचरा व्यवस्थापन तसेच घरच्या घरी कंपोस्ट करणे, बायोगॅस निर्मिती करणे आणि आजुबाजूच्या परिसरात दुर्गंधी निर्माण न होता आरोग्यदायी वातावरण राहिल अशा पद्धतीने समाजामध्ये विकेंद्रित कचरा प्रक्रिया सुविधा निर्माण करण्यासाठी समाजाचा सहभाग वाढविणे.

यु) स्थानिक संस्थेतर्फे चालविण्यात येत असलेल्या उद्याने व उपवनांमध्ये दोन वर्षात टप्प्या टप्प्याने रासायनिक खतांचा वापर बंद करून कंपोस्ट खतांचा वापर वाढवणे, स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रातील इतर ठिकाणी देखील याचा अवलंब करावा. असंघटीत क्षेत्रातील घटकांना कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

व्ही) नगर विकास मंत्रालयाने वेळोवेळी प्रस्तुत केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आणि केंद्रिय प्रदुषण मंडळाने निश्चित केलेल्या प्रमाणकांच्या अधिन राहून नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून घनकचऱ्यातील विविध घटकांचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी आवश्यक यंत्रणा स्वत: अथवा खाजगी संस्थांच्या सहभागाने अथवा एखाद्या प्रातिनिधीक संस्थेतर्फे उभारावी. घनकचरा प्रक्रिया सुविधा उभारणाऱ्या संस्थांना बांधकामासाठी तसेच सुविधा कार्यान्वित करण्यासाठी आणि देखभालीसाठी आवश्यक ते सहाय्य करावे. वाहतूक खर्च कमी होण्याच्या दृष्टिने तसेच पर्यावरणावर होणारे खालील परिणाम विचारात घेऊन विकेंद्रित प्रक्रिया सुविधांना प्राधान्य देण्यात यावे.

ए) जैविकरित्या कुजवण्यायोग्य कचऱ्याच्या (Bio-degradable) जैविक स्थिरतेसाठी (Bio-stabilization) जैविक मिथेनीकरण (Bio-methanation), सुक्ष्मजीवी खते (Microbial compounds), गांडूळ खते कंपोस्ट खते, अवायूजीवी पचनक्रिया (Anaerobic digestion) अथवा अन्य कोणत्याही योग्य अशा प्रक्रिया.



Scanned by CamScanner

बी) कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रक्रिया (refuse derived fuel [RDF]) ज्यामध्ये कचऱ्यातील ज्वलनशील कचऱ्यासाठी लागणारे टाकाऊ आणि उरलेले इंधन अथवा घनकचऱ्यावर आधारित वीजनिर्मिती प्रकल्प किंवा सिमेंट भट्टीसाठी लागणारा पूरक माल यांचा समावेश होतो.

डब्ल्यु) या नियमातील परिशिष्ट १ मधील उरलेल्या कचऱ्याची विल्हेवाट यासंबंधी ज्या विहित पद्धतीची तरतूद आहे त्यानुसार स्वच्छता भूभरावासाठी (sanitary landfill) बांधकाम, संचालन आणि देखभाल अथवा आवश्यक यंत्रणेसाठी स्वत: अथवा प्रतिनिधी संस्थेमार्फत जबाबदारी घेणे.

एक्स) वार्षिक अर्थसंकल्पामध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठीच्या भांडवली खर्चासाठी (Capital Expenditure) तसेच देखभाल व दुरुस्ती खर्च (operating and maintenance) यासाठी पुरेशी आर्थिक तरतुद करावी, पुरेसा, आवश्यक निधी घ.क. व्य. कामांसाठी निहीत केल्यानंतर इतर ऐच्छिक कर्तव्ये (Discretionary function) इतर आवश्यक कर्तव्ये (Obligatory functions ) यासाठी निधी उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी.

वाय) जर दैनिक कचऱ्याचे प्रमाण स्वच्छता भूभरावासह ५ मेट्रिक टन (5 MTPD) पेक्षा अधिक असेल तर कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा स्थापन करण्यासाठी अधिकार प्रदान करणेसाठी राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांच्याकडे नमुना क्र. १ चा अर्ज भरून पाठवावा.

झेड) अधिकारपत्राच्या नूतनाकरणासाठी अधिपत्राची वैधता समाप्त होण्याच्या किमान ६० दिवस अगोदर अर्ज सादर करावा.

झेडए) वार्षिक अहवाल सपत्र - IV नंबर नमुन्यामध्ये चालू वर्षाच्या ३० एप्रिल पूर्वी आयुक्त अथवा संचालक नगरपरिषदप्रशासन अथवा पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे सादर करावा.

झेडबी) वार्षिक अहवालाची प्रत दरवर्षी ३१ मे पर्यंत राज्याच्या नगर विकास विभागाच्या किंवा ग्रामपंचायत अथवा ग्रामीण विकास विभागाच्या सचिवांना तसेच संबंधित राज्याच्या राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समिती यांना पाठवावी.

झेडसी) घरोघरी जाऊन वर्गीकृत कचऱ्याच्या संकलनाच्या बाबतीत निरीक्षण करणे त्याचप्रमाणे वर्गीकरण न केलेल्या कचऱ्याची प्राथमिक आणि दुसऱ्या टप्प्यातील वाहतुकीसह प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्रापर्यंत वाहतूक करण्याच्या बाबतीत कंत्राटी कामगारांसह सर्व कामगारांचे प्रबोधन करणे.



झेडडी) सुविधा केंद्रामध्ये काम करणाऱ्या चालकांना वैयक्तिक सुरक्षेसाठी गणवेश, फ्लुरोसेंट जॅकेट, हातमोजे, पावसाळी कोट त्याचप्रमाणे घनकचरा हाताळणाऱ्या सर्व कामगारांना विशिष्ट प्रकारचे बुट आणि मास्क पुरविले असल्याची खात्री करणे.

झेडइ) गृहनिर्माण संस्था अथवा व्यापारी संकुलाच्या बांधकामाचे आराखडे मंजूर करताना त्यामध्ये कचरा संकलन, वर्गीकरण आणि वर्गीकरण केलेल्या कचऱ्याची साठवणूक करण्यासाठी सुविधा केंद्राची तरतूद केली असल्याची खात्री करणे.

झेडएफ) कचरा टाकणाऱ्या आणि कायद्यातील तरतुदींचे पालन न करणाऱ्या व्यक्तिंना जागीच दंड आकारण्याबाबत तसेच स्थानिक संस्थेच्या अधिकाऱ्यांना दंड वसुलीचे अधिकार प्रदान करण्याबाबत विहित निकषासह उपविधी तयार करणे.

झेडजी) कचरा निर्मिती करणाऱ्या लोकांसाठी माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमांतर्गत खालील मुद्द्यांवर जनजागृती करावी.

१) कचरा उघड्यावर टाकू नका.
२) कमीत कमी कचरा निर्माण करा. (Reduce use Reuse)
३) शक्यतो कचऱ्याच्या पुनर्वापर करा.
४) कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणीच त्याचे जैविक विघटनशील (Bio-degradable), अविघटनशील (पुनर्प्रक्रिया करण्या योग्य व ज्वलनशील) (Non-degradable) सॅनिटरी कचरा आणि घरगुती घातक कचरा (domestic hazardous waste) असे वर्गीकरण करा.
५) घरपातळीवर कंपोस्टींग खत, गांडूळ खत, बायोगॅस निर्मिती आणि सामुहिक स्तरावर खतनिर्मिती करा.
६) वापरलेल्या सॅनिटरी वस्तुंचा कचरा ब्रँड धारकांनी सोबत दिलेल्या पाऊचमध्ये किंवा स्थानिक संस्थेने विहित केलेल्या वेष्ठणामध्ये सुरक्षितपणे ठेऊन त्यासाठी ठेवलेल्या कचरा कुंडीमध्ये म्हणजे अविघटनशील कचऱ्यामध्ये ठेवावा.
७) कचरा निर्माण होतो त्याच ठिकाणी वर्गीकरण करुन स्वतंत्र कचरा कुंड्यामध्ये ठेवा.



Scanned by CamScanner

८) वर्गीकरण केलेला कचरा कचरा उचलणाऱ्या व्यक्ति, कचरा संकलक, पुनर्प्रक्रिया करणारे किंवा कचरा संकलन करणाऱ्या प्रतिनिधी संस्थांना देण्यात यावा.

९) घनकचरा व्यवस्थापन पद्धत शाश्वत होण्यासाठी मासिक उपभोक्ता शुल्क कचरा संकलक, स्थानिक संस्था अथवा स्थानिक संस्थेच्या अधिकृत व्यक्तिकडे देण्यात यावे.

झेडएच) स्वच्छता भूभराव कार्यान्वित झाल्यानंतर नियम २३ मध्ये उल्लेख केलेल्या कालबद्ध पद्धतीनुसार मिश्र कचरा जमिनीमध्ये टाकणे अथवा ढिगारे करून ठेवणे त्वरीत बंद करावे.

झेडआय) स्वच्छता भूभरावामध्ये वापरता न येण्यासारखा, पुनर्प्रक्रिया न करण्यासारखा, अविघटनशील, अज्वलनशील, अ प्रतिक्रियाशील, जड, प्रक्रियेपूर्वी नाकारलेला कचरा प्रक्रिया सुविधेतील शिल्लक राहिलेला असाच कचरा पाठविण्यास परवानगी द्यावी. परिशिष्ठ १ मध्ये दिल्यानुसार स्वच्छता भूभराव जागेचा तपशील असावा. कचऱ्याचा प्रत्येक भाग पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करून असा कचरा भूभरावामध्ये जाण्याचे शुन्य प्रमाण करण्याचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य करावे.

झेडजे) उघड्यावर कचरा साठविण्याच्या जुन्या जागा तसेच सध्या कार्यान्वित असलेल्या कचरा साठविण्याच्या जागा जैविक खाणीसाठी (Bio-mining) आणि जैविक उपचारासाठी (Bio-remediate) कितपत उपयुक्त आहेत याबाबत पडताळणी आणि विश्लेषण करावे. जैविक खाण (Bio-mining) आणि जैविक उपचारा (Bio-remediation) साठी आवश्यक कार्यवाही करावी.

झेडके) कचरा साठविण्याच्या जागांची जैविक खाण आणि जैविक उपचारासाठी उपयुक्त नसेल तर पुढील पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी भूभराव बुजवण्याच्या निकषानुसार शास्त्रीय पद्धतीने या जागा बुजवून टाकाव्यात.

## १६) राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समितीच्या जबाबदाऱ्या :-

राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी

ए) सदरील अधिनियम राज्यातील स्थानिक संस्थांच्या माध्यमातून त्यांच्या कार्यक्षेत्रात अंमलात आणावेत. राज्याच्या संचालक नगरपरिषद प्रशासन अथवा



सचिव, नगरविकास विभाग यांच्याशी निकटचा समन्वय साधून या अधिनियमांच्या अंमलबजावणीबाबत किमान वर्षातून दोन वेळा आढावा घ्यावा.

बी) अधिनियमातील परिशिष्ठ १ व परिशिष्ठ २ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी असलेल्या जागांच्या संदर्भात पर्यावरण प्रमाणकांचे (Enviromental Stand) संनियंत्रण करावे.

सी) स्थानिक संस्था अथवा स्थानिक संस्थेने अधिकृत केलेल्या संस्थेकडून नमूना १ मध्ये अधिकरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर अशा प्रस्तावांची छाननी करून आवश्यक ती चौकशी करावी.

डी) अधिकरणासाठी प्राप्त प्रस्तावांची छाननी करताना संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक संमतींची पूर्तता होत असल्याचे तपासावे त्याचप्रमाणे राज्य नगर विकास विभाग, नगर आणि ग्रामीण नियोजन विभाग, जिल्हा नियोजन समिती अथवा महानगरक्षेत्र नियोजन समिती (जी लागू असेल ती) विमानतळ किंवा हवाई क्षेत्र प्राधिकरण, भूजल मंडळ, रेल्वे, वीज वितरण कंपनी, महामार्ग विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अभिप्राय जाणून घ्यावेत. या विभागाकडून अभिप्राय देण्यासाठी चार आठवड्यांचा कालावधी द्यावा.

इ) ज्या स्थानिक संस्था किंवा सुविधा केंद्र चालक किंवा स्थानिक संस्थेची इतर कोणतीही अधिकृत संस्था यांनी परिशिष्ठ १ व २ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक ते सर्व निकष, पर्यावरणासंबंधीची प्रमाणपत्रे आणि इतर अटींची पूर्तता केली असेल तर त्यांना ६० दिवसाच्या आत नमुना २ मध्ये अधिकरणाची मान्यता देण्यात यावी.

एफ) सदर अधिकरणाची वैधता इतर परवानग्यांशी पडताळून पहावी.

जी) जर स्थानिक संस्था किंवा सुविधा केंद्राचे चालक विहित अटींचे पालन करुन सुविधा केंद्र चालविण्यात अयशस्वी ठरले तर कलम (अ) नुसार त्यांना मंजूर झालेले अधिकरण निलंबित करावे अथवा रद्द करावे. मात्र स्थानिक संस्था किंवा सुविधा केंद्राचे चालक यांना पूर्वसूचना दिल्याखेरीज त्यांचे अधिकरण निलंबित अथवा रद्द करण्यात येऊ नये.

एच) अधिकरणाचा नूतनीकरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील ५ वर्षासाठी नूतनीकरण करता येईल. मात्र त्यापूर्वी प्रत्येक अर्जाची गुणवत्तेनुसार छाननी करावी. हे करताना सुविधा केंद्राच्या चालकांनी कायद्यातील तरतुदीनुसार पूर्तता



Scanned by CamScanner

केल्याचे तसेच अधिकरणाच्या विहित अटी किंवा प्रमाणके, आवश्यक संमतीपत्रे आणि पर्यावरणाच्या बाबतीतील सर्व परवाने यांची पूर्तता केल्याची खात्री करावी.

२) राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी अधिकरणाचा अर्ज नाकारण्यापूर्वी किंवा नुतनीकरण नाकारण्यापूर्वी अर्जदाराची बाजू समजून घेण्यासाठी पुरेसी संधी द्यावी तसेच या सर्वांची लिखित स्वरूपात नोंद ठेवावी.

३) एखाद्या नव्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत केंद्रीय पर्यावरण नियंत्रण मंडळ, राज्य पर्यावरण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी प्रमाणके निश्चित केलेली नसतील तर अशा प्रकरणी केंद्रीय पर्यावरण नियंत्रण मंडळाशी संपर्क साधून विहित प्रमाणके तयार करुन घ्यावीत.

४) राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी विहित प्रमाणकांचे, मंजूर केलेल्या संस्करण तंत्राचे अधिकारपत्रातील घालण्यात आलेल्या अटींचे आणि अधिनियमाच्या परिशिष्ठ १ व २ नुसार विहित प्रमाणकांचे उचित वाटेल तेव्हा परंतु वर्षातून किमान एक वेळा तरी संनियंत्रण करावे.

५) कचरा निर्मिती करणाऱ्यांनी घरगुती घातक कचरा साठवणूक सुविधा केंद्रामध्ये आपला घरगुती घातक कचरा जमा केला असेल तर अशा कचऱ्याची हाताळणी व विल्हेवाट या संदर्भात राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी स्थानिक संस्थांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

६) राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी आंतरराज्य कचरा हालचालीच्या संदर्भात नियमितता आणावी.

## १७) सॅनिटरी नॅपकीन्स, डायपर्स यासारख्या वापरून फेकण्यासारख्या उत्पादनांच्या ब्रँडमालकांच्या जबाबदाऱ्या :-

१) काच, प्लॅस्टिक पॅकेजिंग साहित्य यासारख्या वापरून टाकण्यासारख्या वस्तुंचे उत्पादक किंवा ब्रँडमालक जे बाजारपेठेत अशा प्रकारची उत्पादने आणत असतात त्यांनी घनकचरा व्यवस्थापन पद्धत कार्यान्वित करण्यासाठी स्थानिक संस्थांना आवश्यक आर्थिक सहाय्य करावे.

२) जे ब्रँड मालक अविघटनशील स्वरूपाच्या पॅकेजिंग उत्पादनांची बाजारात विक्री करतात किंवा बाजारात ठेवतात त्यांनी त्यांच्या उत्पादनामुळे जो पॅकेजिंगचा कचरा निर्माण होतो तो परत घेऊन विशिष्ट ठिकाणी टाकण्याची व्यवस्था निर्माण करावी.

३) सॅनिटरी नॅपकीन आणि डायपर्स सारखी उत्पादने तयार करणाऱ्या उत्पादकांनी अथवा ब्रँड मालकांनी अथवा व्यापारी संस्थांनी त्यांच्या उत्पादनामध्ये अशा साहित्याचा उपयोग करावा की ज्यावर पुनर्प्रक्रिया करता येईल अन्यथा प्रत्येक सॅनिटरी नॅपकीन किंवा डायपर्सची विल्हेवाट लावण्यासाठी त्याच्या सोबतच ग्राहकांना पाऊच किंवा वेष्टण पुरवावे.

४) अशा प्रकारच्या सर्व उत्पादकांनी, ब्रँडमालकांनी किंवा विक्रेत्या प्रतिनिधी संस्थांनी आपल्या उत्पादनांची वापरानंतर सोबत पुरविण्यात आलेल्या वेष्ठणाच्या सहाय्याने कशी विल्हेवाट लावायची याबाबत ग्राहकांचे प्रबोधन करावे.

## १८) घन कचऱ्यावर आधारित कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याच्या त्याचप्रमाणे टाकाऊ वस्तूपासून इंधन प्रकल्पाच्या १०० किलो मीटर परिसरात असलेल्या उद्योग प्रकल्पांच्या जबाबदाऱ्या :-

१) घनकचऱ्यावर आधारित टाकाऊ वस्तूपासून प्राप्त करावयाच्या इंधन प्रकल्पाच्या १०० कि.मी. परिसरात जे उद्योग प्रकल्प आहेत त्यांनी हा अधिनियम अधिसूचित झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत त्यांच्या प्रकल्पात एकूण इंधन गरजेपैकी किमान पाच टक्के इंधन हे टाकाऊ वस्तूपासून (RDF) प्राप्त केलेले वापरावे.

## १९) घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्राच्या स्थापनेच्या दृष्टिने जबाबदाऱ्यांचे निकष :-

१) घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्रासाठी सुयोग्य अशी जागा उपलब्ध करून देणे आणि अशा जागांच्या बाबतीत राज्य सरकार अथवा केंद्र शासित प्रदेश यांच्यामार्फत अधिसूचना जारी करणे ही जबाबदारी भूमी वाटप विभाग प्रमुखांची राहील.

२) सुविधा केंद्राच्या चालकाने केंद्र शासनाच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे त्याचप्रमाणे नगरविकास मंत्रालयाने घनकचरा व्यवस्थापनासंबंधी तयार केलेल्या नियमावलीनुसार सुविधा केंद्राची रचना करावी.

३) सुविधा केंद्र चालकाने राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समितीकडून आवश्यक त्या मान्यता प्राप्त करून घ्याव्यात.



Scanned by CamScanner

४) घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्र कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक प्रमाणकाच्या बाबतीत राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी सनियंत्रण करावे.

५) केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्याचप्रमाणे नगरविकास मंत्रालयातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या व वेळोवेळी अद्यावत केलेल्या नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन नियमावलीनुसार घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्र सुरक्षितपणे तसेच प्रदुषणाच्या दृष्टिने सुयोग्यपणे चालविण्याच्या दृष्टिने सुविधा केंद्र चालक जबाबदार राहतील.

६) घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्र चालकाने दरवर्षी ३० एप्रिल पर्यंत राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळास अथवा प्रदुषण नियंत्रण समितीस नमुना क्र. ३ मध्ये वार्षिक अहवाल सादर करावा.

## २०) डोंगराळ क्षेत्रात (Hilly Areas) घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टिने करावयाच्या कार्यवाहीचे निकष:-

डोंगराळ क्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणाच्या जबाबदाऱ्या या नियम १५ मध्ये दर्शविल्यानुसारच राहतील तथापि, खालीलप्रमाणे अतिरिक्त कलमे राहतील.

ए) टेकडीवर भूभरावाचे बांधकाम टाळावे. प्रक्रिया सुविधा केंद्रातील शिल्लक कचरा तसेच जड कचरा संकलीत करण्यासाठी स्थलांतर केंद्राची स्थापना योग्य ठिकाणी करण्यात यावी. स्वच्छ भूभराव निर्मितीसाठी (sanitary landfill) टेकडीच्या खालील बाजूस सपाट जागेवर २५ कि.मि. च्या परिसरात योग्य जागा निवडावी. स्थलांतर केंद्रातील शिल्लक कचऱ्याची भूभरावामध्ये विल्हेवाट लावावी.

बी) जर अशी जागा उपलब्ध होऊ शकली नाही तर जड व उरलेल्या कचऱ्यासाठी विभागीय भूभरावाची निर्मिती (Inest residential waste) करावी.

सी) नागरिकांनी रस्त्यावर कचरा फेकू नये तसेच पर्यटकांनी कागद, वापरलेल्या प्लॅस्टिक बाटल्या, मद्याच्या बाटल्या, शीतपेयांचे डबे, टेट्रा पॅक्स किंवा अन्य कागद किंवा प्लॅस्टिकचा कचरा रस्त्यावर किंवा टेकडीवरून खाली टाकू नये यासाठी सक्त सूचना देण्यात याव्यात. त्याऐवजी पर्यटनस्थळाच्या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या कचराकुंडीमध्ये कचरा टाकण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे. याबाबत स्थानिक संस्थेने आपल्या उपविधीमध्ये आवश्यक तरतूद करावी.



डी) स्थानिक संस्थेने घनकचरा व्यवस्थापन उपविधीतील तरतुदींची माहिती सर्व पर्यटकांना देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. शहरांच्या प्रवेशद्वारावर, हॉटेल्स, अतिथीगृहे, पर्यटक निवासस्थानाच्या ठिकाणी अथवा पर्यटन स्थळाच्या ठिकाणी होर्डींग उभारण्यात यावेत.

इ) घनकचरा व्यवस्थापन पद्धत शाश्वत होण्यासाठी त्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम वसुल करण्यासाठी पर्यटनस्थळाच्या प्रवेशद्वारावर पर्यटकांच्याकडून घनकचरा व्यवस्थापन वसुली करण्याची व्यवस्था करावी.

एफ) विकेंद्रित कचरा प्रक्रिया सुविधा केंद्र स्थापनेसाठी डोंगराळ भागातील सुयोग्य अशी जागा निश्चित करून त्याकरीता जमीन प्रदान करण्याचे काम भूवाटप विभागाच्या प्रमुखांचे राहील. स्थानिक संस्थेने ही सुविधा द्यावी. डोंगरमाथ्यावरील जागेचा सुयोग्य वापर करण्यासाठी उतारावर स्टेप गार्डन पध्दत वापरावी.

## २१) कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रक्रियेसाठी निकष :-

१) पुर्नप्रक्रिया न करण्यासारखा कचरा ज्याचे उष्मांकमूल्य १५०० के/कॅलरीज/कि.ग्रॅ. किंवा त्याहून अधिक आहे अशा कचऱ्याची भूभरावामध्ये विल्हेवाट न लावता त्याचा नको असलेल्या इंधनाच्या (RDF) माध्यमातून वीज निर्मिती करण्यासाठी अथवा इंधनासाठी RDF साठी कच्चा माल म्हणून वापर करावा.

२) उच्च उष्मांक असलेल्या कचऱ्याचा उपयोग सिमेंट निर्मिती अथवा थर्मल विद्युत निर्मिती प्रकल्पामध्ये करावा.

३) दररोज ५ टन क्षमतेपेक्षा अधिक कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प उभारणी करू इच्छिणाऱ्या स्थानिक संस्थांनी किंवा सुविधा केंद्र चालकांनी किंवा अधिकृत एजन्सींनी अधिकरणासाठी नमुना क्रमांक १ मध्ये राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे किंवा प्रदुषण नियंत्रण समितीकडे अर्ज सादर करावा.

४) कचऱ्यापासून वीजनिर्मितीसाठी प्रकल्प उभारणीसाठी प्राप्त अर्जाच्या संदर्भात राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी ६० दिवसांच्या आत अर्जाची छाननी करून परवानगी द्यावी.



Scanned by CamScanner

## २२) कार्यवाहीसाठी कालबद्ध कार्यक्रम :-

स्थानिक संस्था किंवा इतर संबंधित प्राधिकरण नियमांच्या अंमलबजावणीसाठी स्वतः अथवा एखाद्या एजन्सीमार्फत आवश्यक ती यंत्रणा खालील कालबद्ध कार्यक्रमानुसार निर्माण करावी.

| अ.क्र. | कृती | नियमांबाबत अधिसूचना जाहिर झालेल्या तारखेपासूनचा कालावधी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १) | घनकचरा प्रक्रिया सुविधा केंद्रासाठी योग्य जागेची निवड | १ वर्ष |
| २) | ५ लाखा पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक प्राधिकरण समुहांसाठी सामुहीक प्रादेशिक स्वच्छता भूभराव स्थापने साठी योग्य जागेची निवड त्याचप्रमाणे किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व स्थानिक प्राधिकरणासाठी प्रादेशिक स्वच्छता भूभराव सुविधा अथवा स्वतंत्र स्वच्छता भूभराव स्थापनेसाठी योग्य जागेची निवड. | १ वर्ष<br>५ लाख |
| ३) | घनकचरा प्रक्रिया सुविधा केंद्र अथवा स्वच्छता भूभराव सुविधा केंद्राची जागा ताब्यात घेणे. | २ वर्षे |
| ४) | जैविक विघटनशील, पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य, ज्वलनशील, सॅनिटरी कचरा, घरगुती घातक कचरा आणि जड (Inert) घनकचरा यासारखा कचरा निर्मिती करणाऱ्यांना जागीच कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास भाग पाडणे. | २ वर्षे |
| ५) | घरोघरी जाऊन कचरा संकलित करणे, त्याचे वर्गीकरण करणे, आणि प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा केंद्रापर्यंत २ वर्षे कचऱ्याची बंदिस्त वाहनातून वाहतूक करणे. | |
| ६) | बांधकाम करताना आणि जुने बांधकाम पाडताना होणाऱ्या कचऱ्याची (C & D Waste) स्वतंत्र साठवणूक आणि वाहतूक होत असल्याची खात्री करणे. | २ वर्षे |
| ७) | १ लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व स्थानिक संस्थांच्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन सुविधा स्थापन करणे. | २ वर्षे |
| ८) | १ लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक संस्था व जनगणना शहरांच्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन सुविधा स्थापन करणे. | ३ वर्षे |
| ९) | ५ हजार किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व स्थानिक संस्थांच्या ठिकाणी सामुहिक अथवा स्वतंत्र स्वच्छता भूभराव तयार करून त्या ठिकाणी नियमानुसार मान्य असलेल्या प्रक्रिया सुविधा केंद्रामधील शिल्लक कचऱ्याची त्याचप्रमाणे संस्करण न केलेल्या जड कचऱ्याची विल्हेवाट लावणे. | ३ वर्षे |
| १०) | ५ लाखा पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक संस्था आणि जनगणना शहरांच्या ठिकाणी सामुहीक प्रादेशिक भूभराव तयार करून नियमानुसार मान्य असलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे. | ३ वर्षे |
| ११) | जुन्या वापरात नसलेल्या कचरा साठवण्याच्या जागा बुजवून टाकणे (capping) अथवा जैविक उपचार प्रणालीसाठी (Bio-remediation) वापरणे. | ५ वर्षे |
| १२) | राज्यशासन तसेच केंद्रशासीत प्रदेशातील स्थानिक संस्थांच्या प्रत्येक विभाग प्रमुखाने नियमांची अधिसूचना जारी झाल्या-पासून सहा महिन्याच्या कालावधीमध्ये खालील सदस्यांचा समावेश असलेले राज्यस्तरीय सल्लागार मंडळ स्थापन करावे. | |





Scanned by CamScanner

## २३) राज्यस्तरीय सल्लागार समिती

| अ.क्र. | पदनाम | सदस्य |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १) | सचिव, नगरविकास विभाग अथवा स्थानिक स्वयंशासन विभाग (राज्य) | पदसिद्ध अध्यक्ष |
| २) | पंचायत अथवा ग्रामीण विकास विभागाचा प्रतिनिधी (राज्य शासनाच्या सहसचिवांपेक्षा कमी दर्जाचा अधिकारी नसावा.) | पदसिद्ध सदस्य |
| ३) | राज्य शासनाच्या महसूल विभागाचा प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ४) | भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ५) | भारत सरकारच्या नगरविकास मंत्रालयाचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ६) | भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ७) | केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ८) | राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समितीचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| ९) | इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी किंवा नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा एक प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| १०) | राज्याचे नगर नियोजन विभागाचे प्रमुख | सदस्य |
| ११) | स्थानिक संस्थातर्फे चक्राकार पद्धतीने तीन प्रतिनिधी | सदस्य |
| १२) | जनगणना शहरे अथवा समुहनगरे यांच्यातर्फे चक्राकार पद्धतीने तीन प्रतिनिधी | सदस्य |
| १३) | कचरा संकलक, अनौपचारिक पुनर्प्रक्रिया करणारे अथवा घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील सन्मान्य स्वयंसेवी संस्था अथवा नागरी संघटना यांचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| १४) | राज्य किंवा केंद्रीय स्तरावरील औद्योगिक संघटनेचा सदस्य एक प्रतिनिधी | |
| १५) | कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करणाऱ्या उद्योग क्षेत्राचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| १६) | दोन विषयतज्ञ | सदस्य |
| १७) | राज्य शासनाच्या कृषि आणि कामगार विभागातर्फे प्रत्येकी एक प्रतिनिधी सहनिर्वाचित करणे. | सदस्य |



२) या अधिनियमांच्या अंमलबजावणीसंबंधी प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय सल्लागार मंडळाची सहा महिन्यातून किमान एकदा तरी बैठक आयोजित करण्यात यावी. अधिनियमांची योग्य तऱ्हेने आणि गतीने अंमलबजावणी होण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही तसेच राज्याच्या घनकचरा व्यवस्थापन धोरण व कार्यपद्धती या विषयी हे मंडळ मार्गदर्शन करेल.

३) आढावा घेतल्यानंतर त्या संबंधीच्या अहवालाच्या प्रती राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समिती यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात.

## २४) वार्षिक अहवाल

१) सुविधा केंद्रांच्या चालकांनी आपला वार्षिक अहवाल दरवर्षी ३० एप्रिल पूर्वी नमुना क्र. ३ मध्ये स्थानिक संस्थेस सादर करावा.

२) स्थानिक संस्थांनी आपले वार्षिक अहवाल नमुना क्र. ४ मध्ये दरवर्षी ३० जूनपर्यंत राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती त्याचप्रमाणे संबंधित राज्याच्या अथवा केंद्रशासित प्रदेशाच्या नगरविकास विभागाच्या सचिवांना सादर करावेत. महानगरे असल्यास त्यांनी संचालक नगरपरिषद प्रशासन अथवा आयुक्त नगरपरिषद प्रशासन यांना आणि इतर स्थानिक संस्थांनी नागरी स्थानिक संस्थांच्या मुख्य अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावेत.

३) प्रत्येक राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांनी एकत्रित तयार केलेला अहवाल केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळास आणि शहर विकास मंत्रालयास नमुना क्र. ५ मध्ये दरवर्षी ३१ जुलै पर्यंत सादर करावा. या अहवालामध्ये अधिनियमांची अंमलबजावणी त्याचप्रमाणे यासंबंधी पूर्तता न करणाऱ्या स्थानिक संस्थांवर केलेली कारवाई याबाबत माहिती असावी.

४) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ आपला एकत्रित अहवाल दर वर्षी ३१ ऑगस्टपर्यंत शहर विकास मंत्रालय व पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयास सादर करेल. यामध्ये देशातील स्थानिक संस्थांतर्फे अधिनियमांच्या बाबतीत केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती आणि त्या अनुशंगाने केलेल्या शिफारशी यांचा समावेश असेल.

५) या वार्षिक अहवालाचा आढावा पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयातर्फे केंद्रीय संनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात येईल.

## २५) अपघातासंबंधी अहवाल

कोणत्याही घनकचरा प्रक्रिया, किंवा संस्करण किंवा विल्हेवाट सुविधा केंद्रामध्ये, अथवा भूभरावाच्या ठिकाणी अपघात घडल्यास सुविधा केंद्राच्या मुख्य अधिकाऱ्यांनी नमुना क्र. ६ मध्ये संबंधित स्थानिक संस्थेस अहवाल सादर करावा. स्थानिक संस्था त्यासंबंधी आढावा घेऊन सुविधा केंद्राच्या प्रमुखास योग्य त्या सूचना देईल.



Scanned by CamScanner

## परिशिष्ट १

## (पहा नियम नियम १५ डब्लु, झेडआय, १६(१) (बी) (इ),१६/४)

### स्वच्छता भूभरावासाठी अचूक तपशील :-

A) **जागा निवडीचे निकष :-** (speciation for sanitary landfill)

१) भूमी मंजूर व प्रदान करण्याचे अधिकार असलेल्या विभागाने घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्रासाठी योग्य जागा उपलब्ध करून द्यावी तसेच ती अधिसुचित करावी.

२) स्वच्छता भूभराव जागेचे नियोजन, रचना आणि विकसीत करताना बांधकामाचा आराखडा त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्याच्या कामांचा सूक्ष्म आराखडा यासह योग्य ते दस्तऐवज तयार करावेत. जर का सद्याच्या भूभरावाच्या शेजारीच नवीन भूभराव तयार करण्यात आला असेल तर सद्याच्या भूभरावाच्या सूक्ष्म आराखड्यामध्ये नवीन भूभरावाचा समावेश करुन त्याचाच एक भाग म्हणून प्रस्तावित करावे.

३) भूभरावाची जागा निश्चित करताना कचरा प्रक्रिया सुविधा केंद्राच्या जवळच करावी अथवा कचरा प्रक्रिया केंद्र हे भूभरावाचा एक भाग म्हणून त्याच्या जवळच नियोजन करावे.

४) भूभरावाची जागा ही भारत सरकारच्या शहर विकास मंत्रालयाच्या आणि केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार निश्चित करावी.

५) सद्याच्या भूभरावाच्या जागा पाच वर्षाहून अधिक काळ वापरात असल्यास या परिशिष्टामध्ये देण्यात आलेल्या अचूक तपशीलानुसार विकसीत कराव्यात.

६) भूभरावाच्या ठिकाणी पाणी साचू नये तसेच त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी त्याचे छोटे भाग हे टप्याटप्प्याने विकसीत करण्यात यावेत तसेच पुढील २० ते २५ वर्षे वापरता येतील अशा दृष्टिने त्याची जागा पुरेशी मोठी असावी.

७) भूभरावाची जागा ही नदीपासून १०० मिटर, तलावापासून २०० मिटर तसेच महामार्ग, वस्तीस्थाने, सार्वजनिक उद्याने आणि पाणी पुरवठा करण्याचा विहिरी यांच्यापासून २०० मिटर अंतरावर असावी. विमानतळ किंवा हवाईक्षेत्र यापासून भूभराव जागा २० कि.मी. अंतरावर असावी. तथापि हवाई उड्डाण प्राधिकरण अथवा हवाई दल यांचे ना हरकत प्रमाणपत्र असल्यास विशेष बाब म्हणून भूभराव जागा विमानतळ अथवा हवाईक्षेत्र यांच्यापासून १० ते २० कि.मी. अंतरावर निश्चित करता येईल. गत १०० वर्षाच्या नोंदणी आधारे तयार केलेल्या पूरनियंत्रण क्षेत्र, समुद्रकिनारा नियामक क्षेत्र, दलदलीचा भूभाग, समस्याग्रस्त वस्तीस्थाने आणि पर्यावरणाच्या दृष्टिने संवेदनशील क्षेत्रामध्ये भूभराव जागा निश्चित करता येणार नाही.



८) भूभरावाची तसेच घनकचऱ्यावरील प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्राची जागा विकास आराखड्या अंतर्गत यांचा नगर नियोजन (Existing Land Use) विभागाच्या भूवापर नियोजन आराखड्यामध्ये समावेश करावा.

९) दररोज पाच टनापेक्षा अधिक क्षमतेच्या घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्राच्या भोवताली कोणत्याही विकासकामाना प्रतिबंध करणारे मध्यवर्ती क्षेत्र (Buffer Zone) म्हणून राखीव ठेवावे. घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा केंद्रासाठी एकूण उपलब्ध जागेमध्येच हे राखीव क्षेत्र असेल. संबंधित राज्याच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सहमतीने स्थानिक संस्थेने प्रत्येक ठिकाणच्या गरजेनुसार मध्यवर्ती क्षेत्र निश्चित करावे.

१०) बायोमेडिकल (जैव वैद्यकीय) कचऱ्याची विल्हेवाट ही बायोमेडिकल कचरा व्यवस्थापन कायदा २०१६ मधील वेळोवेळी दुरूस्ती करण्यात आलेल्या तरतुदीनुसार लावावी. घातक कचऱ्याचे व्यवस्थापन देखील घातक व इतर कचरा (व्यवस्थापन आणि हद्दीवरील हालचाली) कायदा २०१६ च्या वेळोवेळी दुरूस्त झालेल्या तरतुदीनुसार करावे. याशिवाय इ. कचऱ्याचे व्यवस्थापन देखील इ. कचरा व्यवस्थापन कायदा २०१६ च्या वेळोवेळी दुरूस्त केलेल्या तरतुदीनुसार करण्यात यावे.

११) कचऱ्यावर प्रक्रिया करताना प्रक्रियेशिवाय शिल्लक राहिल्यास, आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे कचरा शिल्लक राहिल्यास तो साठविण्यासाठी प्रत्येक भूभराव जागेच्या जवळ तात्पुरते साठवणूक केंद्र उभारावे.

### बी) स्वच्छता भूभरावाच्या ठिकाणी सुविधा विकसीत करण्यासाठी निकष:-

१) भूभरावाच्या ठिकाणी येणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवण्यासाठी तसेच अनाधिकृत व्यक्ति अथवा भटकी जनावरे येऊ नयेत म्हणून भूभरावाच्या जागेस कुंपण अथवा काटेरी कुंपण (Hedge) घालून आत जाण्यासाठी योग्य ते प्रवेशद्वार ठेवावे.

२) या क्षेत्रात वाहने आणि यंत्रसामुग्री यांची व्यवस्थित हालचाल होण्यासाठी त्याचप्रमाणे धुलीकण उडू नयेत म्हणून संपर्क रस्ते तसेच अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करावे किंवा पेविंग करण्यात यावे.

३) भूभरावाच्या ठिकाणी आणलेल्या कचऱ्याच्या निरीक्षणासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून द्यावी. याशिवाय दस्तऐवज ठेवण्यासाठी कार्यालय तसेच उपकरणे, प्रदुषण संनियंत्रण उपकरणासह यंत्रसामुग्री ठेवण्यासाठी शेड बांधण्यात यावे. सुविधा केंद्र चालकाने प्रक्रिया आणि विल्हेवाट याकरिता प्राप्त कचऱ्याची व्यवस्थित नोंद ठेवावी.



Scanned by CamScanner

४) भूभरावाच्या ठिकाणी प्राप्त कचऱ्याचे वजन करण्यासाठी वजनकाटा, आग प्रतिबंधक उपकरणे व इतर गरजेनुसार आवश्यक वस्तू पुरविण्यात याव्यात.

५) पिण्याचे पाणी, स्वच्छता गृहे, (प्राधान्याने कामगारांसाठी धुण्यासाठी, आंघोळीसाठी व्यवस्था) वीज पुरवठा यासारख्या अत्यावश्यक गोष्टी भूभरावाच्या ठिकाणी पुरवाव्यात जेणेकरून रात्रीच्या वेळी देखील भूभरावाच्या ठिकाणी काम चालू राहिल.

६) कामगारांच्या आरोग्य तपासणीसह आवश्यक त्या सुरक्षा सुविधा मिळण्याची सोय करावी.

७) घनकचरा वाहून आणणाऱ्या वाहनांसाठी पार्कींग व्यवस्था तसेच वाहने धुण्यासाठी व्यवस्था करावी. याकरिता सांडपाण्यावर विहित प्रमाणकांची (Prescribed standard) पूर्ती करून प्रक्रिया केलेले पाणी वापरास घ्यावे.

## सी) भूभराव कार्यान्वित करण्यासाठी आणि पूर्ण झाल्यानंतर बंदिस्त करण्याच्या संदर्भात सूक्ष्म तपशीलाचे निकष :-

१) भूभरावामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात कचरा बसण्याच्या दृष्टिने त्याचे पातळ थर करून वजनदार कॉम्पॅक्टरद्वारे अधिक दाब देऊन बसवावा. जास्त पाऊस असलेल्या भागात जिथे वजनदार दाबक (Heavy Compactor) वापरणे शक्य नाही तिथे अन्य उपाय योजावेत.

२) जोपर्यंत खतनिर्मितीसाठी घनकचरा प्रक्रिया सुविधा किंवा पुनर्प्रक्रिया अथवा ऊर्जा पुनर्प्राप्ती सुविधा कार्यान्वित होत नाही तोपर्यंत कचरा स्वच्छता भूभरावामध्ये पाठवावा. भूभरावाचे कप्पे दररोज कामकाजाचा दिवस संपताना १० सेंमी. मातीच्या थराने, जाड मुरमाने किंवा इतर बांधकाम साहित्याने बंद करावेत.

३) भूभरावामध्ये पावसाचे पाणी झिरपू नये यासाठी मान्सून सुरू होण्यापूर्वी भूभरावाच्या मध्यभागी ४० ते ६५ सेंमी जाडीच्या मातीचा थर टाकून व त्याला पुरेसा दाब देऊन भरून घ्यावे. कार्यान्वित असलेल्या भूभरावाच्या कप्प्यांमधील पाणी वाहून जाण्यासाठी आवश्यक ती पावसाळी गटारे बांधून घ्यावीत.

४) भूभरावाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यावर अंतीमरित्या टाकण्याचे झाकण अशा पद्धतीने बनवावे की जेणेकरून त्यामध्ये पाणी झिरपणार नाही आणि धुपटी होणार नाही. हे अंतिम झाकण तयार करताना खालील सूक्ष्म तपशीलांची पूर्तता होईल असे पहावे.

ए) अंतिम झाकण टाकताना ६० सेंमी जाडीचा चिकणमातीचा थर किंवा जिच्या प्रवेशक्षमतेच्या (Permeability) गुणांक 1 x 10-7 सेंमी पेक्षा कमी आहे अशा सुधारित मातीचा थर प्रतिबंध म्हणून वापरावा.



बी) प्रतिबंध (Barrier) म्हणून वापरण्यात आलेल्या मातीच्या थराच्या वरील बाजूस १५ सेंमी जाडीचा पाणी निचरा करण्यासाठीच असावा.

सी) ड्रेनेज थराच्या वरील बाजूस ४५ सेंमी जाडीचा झाडा झुडपांच्या पालापाचोळ्याचा थर टाकावा जेणेकरून नैसर्गिक वनस्पती वाढून धूप कमी होण्यास मदत होईल.

## डी) प्रदुषण प्रतिबंधासाठी निकष :-

भूभराव कार्यान्वित करताना प्रदुषण प्रतिबंधासाठी खालील तरतुदींचा समावेश असेल.

१) पावसाळी गटारे बांधकामाची रचना अशी करावी की, वाहते पाणी हे भूभरावाच्या जागेपासून अन्यत्र वळवले जाईल आणि घनकचरा असलेल्या ठिकाणापासून निचरा झालेले पाणी व जमिनीवरील वाहते पाणी एकत्रित होणार नाही. निचरा कमी करण्यासाठी, जमिनीवरील पाणी प्रदुषित होऊ नये म्हणून तसेच पूर आणि दलदल टाळण्यासाठी पावसाळी पाणी अन्यत्र वळविण्यासाठी गटारांची तरतूद करावी.

२) कचरा विल्हेवाट जागेच्या तळास आणि भिंतींना न झिरपणाऱ्या अस्तराची (Non-permeable lining system) पद्धत अवलंबावी. भूभरावामध्ये द्रव पदार्थांच्या कुप्या, ब्लेचेस, पॉलीश, बॅटरीज, टाकाऊ तेल, रंग, किटकनाशके यासारखा कचरा प्रक्रियेनंतर शिल्लक कचरा, मिश्रित कचरा किंवा घातक पदार्थांमुळे दुषित कचरा यांच्यासाठी १.५ मि.मि. जाडीचे आणि उच्च घनतेच्या पॉलिइथिलिन (HDPE) किंवा Geo-synthetic चे अस्तर तयार करावे. अथवा वरील बाजूस समांतरअसे ९० से. मी. मातीचे (चिकण माती किंवा सुधारित माती) अस्तर तयार करावे. याच्या झिरपण्याच्या क्षमतेचा गुणांक १×१०-७ से.मी.सेकंद पेक्षा अधिक नसावा. जमीनीतील पाण्याची जी उच्च पातळी (Highest level of water table) असेल त्याच्यावर २ मीटर.

३) निचरा झालेल्या पाण्याची (Leachate) साठवणूक आणि संस्करण यासह त्याच्या व्यवस्थापनाची तरतूद करावी. संस्करण केलेल्या निचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करावी अथवा मान्यतेप्रमाणे त्याचा वापर करावा. अन्यथा परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या तपशीलानुसार मानकांची पूर्तता करून निचरा मैला वाहून नेणाऱ्या गटारात सोडावा. कोणत्याही परिस्थितीमध्ये उघड्यावर सोडून देण्यात येवू नये.

४) भूभरावातील निचरा झालेले पाणी (Leachate) कोणत्याही परिस्थितीत जलवाहिन्या, ओढे, नदी, तलाव, उघडे डबके यामध्ये वाहून जाणार नाही यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. जर कां वाहते पाणी निचरा झालेल्या पाण्यामध्ये किंवा घनकचऱ्यामध्ये मिसळले तर संबंधित प्राधिकृत संस्थेने संपूर्ण मिश्रित पाण्यावर प्रक्रिया करावी.



Scanned by CamScanner

## इ) पाण्याच्या गुणवत्तेच्या संनियंत्रणाचे निकष :-

१) कोणत्याही भूभरावाची जागा निश्चित करण्यापूर्वी त्या क्षेत्रातील भूजल गुणवत्तेची पायाभूत माहिती मिळवून भविष्याच्या दृष्टिने दस्तऐवजाच्या स्वरूपात संग्रही ठेवावी. भूभराव जागेच्या ५० मीटर परिघाच्या परिसरातील भूजलाची गुणवत्ता वर्षातील वेगवेगळ्या ऋतुमध्ये विशिष्ठ कालावधीत तपासावी. यामध्ये उन्हाळा, पावसाळा आणि पावसाळ्यानंतरच्या काळात तपासून भूजल दुषित नसल्याची खात्री करावी.

२) भूभरावाच्या जागेच्या खालील व सभोवतालच्या भूजलाचा वापर पिणे आणि सिंचन यासह कोणत्याही कारणासाठी करावयाचा असल्यास पाण्याच्या गुणवत्तेबाबत खात्री करूनच करण्यात यावा. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत गुणवत्ता तपासण्यासाठी खालील सूक्ष्म

| S. No. | Parameters | IS 10500:2012, Edition 2.2 (2003-09) Desirable limit (mg/l except for pH) |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1) | Arsenic | 0.01 |
| 2) | Cadmium | 0.01 |
| 3) | Chromium (as Cr6+) | 0.05 |
| 4) | Copper | 0.05 |
| 5) | Cyanide | 0.05 |
| 6) | Lead | 0.05 |
| 7) | Mercury | 0.001 |
| 8) | Nickel | - |
| 9) | Nitrate as NO3 | 45.0 |
| 10) | pH | 6.5-8.5 |
| 11) | Iron | 0.3 |
| 12) | Total hardness (as CaCO3) | 300.0 |
| 13) | Chlorides | 250 |
| 14) | Dissolved solids | 500 |
| 15) | Phenolic compounds (as C6H5OH) | 0.001 |
| 16) | Zinc | 5.0 |
| 17) | Sulphate (as SO4) | 200 |



## फ) आजूबाजूच्या हवेची (Ambient Air) गुणवत्ता तपासण्याचे निकष :-

१) भूभरावाच्या जागी दुर्गंधी पसरु नये म्हणून विरुद्ध दिशेने गॅस वाहण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि विस्थापित भूभरावाच्या वरील बाजूस लावलेली झुडपे टिकविण्यासाठी भूरावाच्या जागी गॅस नियंत्रक प्रणाली व गॅस संकलन प्रणाली कार्यान्वित करावी. भूभरावामध्ये गॅसच्या पुनर्प्राप्तीसाठी ग्रंथाशालीरपलश हे उपकरण आच्छादित स्वरूपात गॅस संकलन कुपीसह वापरण्यात यावे.

२) भूभरावाच्या ठिकाणी जमा झालेल्या मिथेन गॅसचे प्रमाण त्याच्या न्यूनतम स्फोटक मर्यादेच्या २५ टक्क्याहून अधिक नसावे.

३) भूभरावाच्या ठिकाणी संकलन केंद्राकडून जमा झालेला जो गॅस असेल तो थेट औष्णिक कारणासाठी वापरावा अथवा योग्यतेप्रमाणे वीजनिर्मितीसाठी वापरावा. अन्यथा हा गॅस प्रज्वलीत करून जाळावा. कोणत्याही परिस्थितीत हा गॅस थेट वातावरणामध्ये सोडू नये किंवा अवैध कारणासाठी वापरू नये. जर का गॅस वापरणे अथवा प्रज्वलीत करून सोडणे शक्य नसेल तर तो निष्क्रीय करून योग्य मार्गाने सोडता येईल.

४) भूभरावाच्या अत्यंत नजिकच्या परिसरातील हवेची गुणवत्ता नियमित तपासणे गरजेचे आहे. कैंद्रिय पर्यावरण नियंत्रण मंडळाने औद्योगिक क्षेत्रासाठी जी प्रमाणके निश्चित केली आहेत त्यानुसार हवेची गुणवत्ता तपासावी.

## G) भूभरावाच्या जागी (Landfill site) वृक्षारोपण करण्याबाबतचे निकष:-

भूभराव वापरास बंद केल्यानंतर (past - Closure) कमीत कमी १५ वर्षे काळजी घ्यावी. त्यामध्ये खालील बार्बीचा समावेश असावा.

ए) अशी झाडे लावावीत जी स्थानिकरित्या उपलब्ध असतील तसेच खाण्यास उपयुक्त नसलेली आणि बारमाही टिकणारी (perennial plant) असतील जेणेरून दुष्काळ अथवा कडक उन्हामध्ये देखील टिकून राहतील.

बी) रोपाची निवड अशी करावी की ज्याची मुळ ३० सेंमी पेक्षा अधिक खोल जाणार नाहीत. भूभराव सुस्थिर होईपर्यंत या निकषाचे पालन करावे.

सी) कमी पोषणमुक्त असलेल्या मातीत वाढण्याची आणि कमीत कमी पोषक अन्न लागेल अशा क्षमतेची रोपे निवडावीत.

डी) मातीची धूप कमीत कमी होण्याच्या दृष्टिने रोपे आवश्यक घनतेने लावावीत.

इ) राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अथवा प्रदुषण नियंत्रण समितीच्या सल्ल्याने भूभरावाच्या चारही बाजूच्या हद्दीवर हरितपट्टा विकसित करावा.



Scanned by CamScanner

### एच) भूभराव पूर्ण झाल्यानंतर घ्यावयाच्या दक्षतेचे निकष :-

१) भूभराव भरून पूर्ण झाल्यानंतर पुढील १५ वर्षे त्याची निगा राखली पाहिजे तसेच दीर्घकाळ संनियंत्रण केले पाहिजे. याबाबत खालील बाबींचा विचार करून निगा राखण्याबाबत नियोजन केले पाहिजे.

ए) अंतिम आच्छादनाचा एकसंघपणा आणि परिणामकारकता टिकून राहण्यासाठी दुरूस्ती करणे तसेच झीज होऊ नये म्हणून अथवा नुकसान होऊ नये म्हणून रन ऑन-रन ऑफ न करणे. (preventing run-on and run off from eroding)

बी) आवश्यकतेनुसार निचरा संकलन (Leachate collection) प्रणालीचे संनियंत्रण करणे.

सी) भूभरावामधील आणि आजुबाजूच्या भूजलाचे संनियंत्रण करणे.

डी) विशिष्ट प्रमाणकानुसार भूभराव गॅस संकलन प्रणाली कार्यान्वित करणे आणि त्याची देखभाल करणे.

२) भूभराव पूर्ण होऊन १५ वर्षे संनियंत्रण केल्यानंतर त्या ठिकाणी मनुष्यवस्ती करण्याबाबत विचार करता येईल. अन्यथा वायूरूप उत्सर्जन आणि निचऱ्याची गुणवत्ता यांची विहित प्रमाणकांशी पडताळणी करून त्याचप्रमाणे माती गुणवत्तेच्या स्थिरतेची खात्री करून त्यानंतरच विचार करता येईल.

### आय) डोंगराळ क्षेत्रासाठी विशेष तरतुदी करण्याबाबतचे निकष :-

जी शहरे अथवा नगरे डोंगराळ भागात आहेत अशा शहरात स्थानिक परिस्थितीनुसार घनकचऱ्याची अंतिम विल्हेवाट लावण्यासाठी पद्धत अनुसरण्याकरिता स्थानिक संस्थेने संबंधित राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ अथवा प्रदुषण नियंत्रण समिती यांची मान्यता घ्यावी. स्थानिक संस्थेने विघटनशील सेंद्रिय कचऱ्याच्या वापराबाबत प्रक्रिया सुविधा केंद्र स्थापन करावे. अविघटनशील, पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य साहित्य यांची साठवणूक करून वरचेवर पुनर्प्रक्रियेसाठी पाठवावे. जड आणि अविघटनशील कचऱ्याचा वापर इमारती, रस्ते बांधकाम किंवा डोंगरावरील भरावासाठी करावा. जर डोंगराळ भागात पुरेशी जागा उपलब्ध होणे शक्य नसेल, रस्ते कामासाठी अथवा भरावासाठी कचरा योग्य वाटला नाही तर सपाट क्षेत्रावर प्रादेशिक भूभरावामध्ये त्याची विल्हेवाट लावावी.



### जे) जुन्या कचरा साठविण्याच्या जागा बंद करणे (closure) आणि अशा जागांची जागेचे पुनर्वसन करणे.

घनकचरा साठवण्याच्या ज्या जागा पूर्ण क्षमतेने भरलेल्या आहेत किंवा योग्य तऱ्हेने रचना केलेल्या भूभरावामध्ये अतिरिक्त कचरा घेण्यास जागा नाही अशी ठिकाणे बंद करण्यासाठी खालील उपाय योजना कराव्यात तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी खालील पर्यायांचा अवलंब करावा.

१) जैविक खाणीद्वारे (Bio-mining) कचऱ्याचे प्रमाण कमी करणे आणि प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेला कचरा नवीन भूभरावामध्ये टाकून अथवा खालील पद्धतीने आच्छादित करणे.

२) घनकचरा टाकून आच्छादन करणे किंवा जीओमेंबरन्सच्या सहाय्याने संकलन व प्रज्वलन/हरितगृह गॅससाठी वापर करणे.

३) वरील अ. ह मध्ये दिल्यानुसार त्याचप्रमाणे गाळाचा थर आणि इतर जाड्या भरड्या मातीने आच्छादित करणे याशिवाय जमिनीतील दुषित पाणी वर उचलून त्यावर संस्करण करण्यासाठी आवश्यक त्या विभाजक भिंतीसह विहिरी तयार करणे.

४) पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी करण्याच्या दृष्टिने अन्य कोणतीही स्विकारार्ह पद्धत, अवलंबणे.



Scanned by CamScanner

## परिशिष्ट २

### (पहा नियम १६ (१), (बी) (ई), १६ (४))

**घनकचरा प्रक्रिया आणि संस्करण यासाठीची प्रमाणके :-**

ए) कंपोस्टींगची प्रमाणक - (Standards of processing and treatment of Solid Waste)

घनकचरा प्रक्रिया केंद्रामध्ये जैविक विघटनशिल कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या विविध उपाय योजनांमध्ये 'कंपोस्टींग' हे एक तंत्रज्ञान असावे. कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पापासून प्रदुषण होऊ नये म्हणून खालील बाबींची पूर्तता करावी.

ए) प्रक्रिया सुविधेच्या ठिकाणी येणारा सेंद्रिय कचऱ्याची प्रक्रिया करण्यापूर्वी योग्य तऱ्हेने साठवणूक करावी. शक्य तो कचरा साठविण्याची जागा बंदिस्त असावी. जर कां कचरा साठविण्याची जागा उघड्यावर असेल तर त्याचा तळ हा पाणी झिरपणार नसावा (impermeable base) बनवून त्याच्या बाजूने निचरा झालेले पाणी आणि जमिनीवरून वाहणारे पाणी यासाठी गटारे बांधून ते पाणी थेट निचरा प्रक्रिया (leachate treatment ) सुविधेच्या ठिकाणी जाण्याची व्यवस्था करावी.

बी) दुर्गंधी, माशा, कुरतडणारे प्राणी, पक्षी आणि आगीचा धोका यापासून बचावासाठी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

सी) जर का काही कारणाने कचरा प्रकल्प बंद पडला किंवा दुरूस्ती करावयाची असल्यास त्यामध्ये कचरा टाकणे प्रथम थांबवावे आणि त्यातील कचरा तात्पुरत्या प्रक्रिया सुविधा केंद्रामध्ये किंवा तात्पुरत्या भूभरावामध्ये पाठविण्याचे त्वरित नियोजन करावे.प्रकल्प पुन्हा सुरू झाल्यानंतर सर्व कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करण्यात यावी.

डी) प्रक्रिया पूर्व व प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेला कचरा नियमितपणे प्रक्रिया सुविधा केंद्रामधून काढून ठेवावा. कोणत्याही परिस्थिती त्या ठिकाणी ढीग लावून ठेऊ नये. पुनर्प्रक्रिया योग्य कचरा योग्य त्या विक्रेत्यामार्फत पाठविण्यात यावा. पुनर्प्रक्रिया न करण्यासारखा उच्च उष्मांकमूल्य असलेले तुकडे वेचून कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाकडे अथवा टाकाऊ वस्तूपासून इंधन तयार करणाऱ्या प्रकल्पाकडे अथवा सिमेंट प्रकल्पातील सहप्रक्रिया केंद्राकडे अथवा औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पाकडे पाठवावेत. केवळ सर्व प्रक्रियेमधून शिल्लक राहिलेला कचराच स्वच्छता भूभरावाकडे पाठवावा.

इ) थळपवी असलेल्या भागाचा तळ पाणी झिरपणार नसावा (impermeable). हा तळ सिमेंट काँक्रीटचा अथवा दाबून बसविलेल्या मातीचा ५० सेंमी जाडीचा असावा. याच्या प्रवेशक्षमतेचा गुणांक १०-७ सेंमी/ड्शल असावा. या तळास १ ते २ टक्के उतार असावा



आणि चारही बाजूने निचरा झालेले पाणी अथवा जमिनीवरून वाहून आलेले पाण्यासाठी जाण्यासाठी गटार असावे.

एफ) आजूबाजूच्या हवेची गुणवत्ता (Ambient air quality) नियमितपणे तपासावी. प्रक्रिया प्रकल्पाच्या काठावरील भागात खालील बाजूने येणाऱ्या वाऱ्यामुळे दुर्गंधी पसरत नसल्याबद्दल वरचेवर तपासावे.

जी) कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पात आर्द्रता टिकून राहण्यासाठी निचरा झालेले पाणी प्रकल्पात पुन्हा पुन्हा फिरवण्यात यावे.

एच) कंपोस्ट खताचे अंतीम उत्पादन हे वेळोवेळी अधिसुचित केलेल्या खत नियंत्रण आदेशातील (FCO) विहित प्रमाणकांनुसार असावे.

आय) सुरक्षित कंपोस्ट निर्मितीच्या दृष्टिने आणि कंपोस्ट खताच्या गुणवत्तेसाठी कंपोस्ट खत, खालील तपशिलवार निकष पूर्ण करणारे असावे.

| Parameters | Organic Compost (FCO 2009) | Phosphate Rich Organic Manure (FCO 2013) |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| Arsenic (mg/Kg) | 10.00 | 10.00 |
| Cadmium (mg/Kg) | 5.00 | 5.00 |
| Chromium (mg/Kg) | 50.00 | 50.00 |
| Copper (mg/Kg) | 300.00 | 300.00 |
| Lead (mg/Kg) | 100.00 | 100.00 |
| Mercury (mg/Kg) | 0.15 | 0.15 |
| Nickel (mg/Kg) | 50.00 | 50.00 |
| Zinc (mg/Kg) | 1000.00 | 1000.00 |
| C/N ratio | <20 | Less than 20:1 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| pH | 6.5-7.5 | (1:5 solution) maximum 6.7 |
| Moisture, percent by weight, maximum | 15.0-25.0 | 25.0 |
| Bulk density (g/cm3) | <1.0 | Less than 1.6 |
| Total Organic Carbon, per cent by weight, minimum | 12.0 | 7.9 |
| Total Nitrogen (as N), per cent by weight, minimum | 0.8 | 0.4 |
| Total Phosphate (as P205) percent by weight, minimum | 0.4 | 10.4 |
| Total Potassium (as K20), percent by weight, minimum | 0.4 | - |
| Colour | Dark brown to black | - |
| Odour | Absence of foul Odor | - |
| Particle size | Minimum 90% should pass through 4.0 mm IS sieve | material Minimum 90% material should pass through 4.0 mm IS sieve |
| Conductivity (as dsm-1), not more than | 4.0 | 8.2 |



| 1) | (2) | (3) | (4) | (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | Suspended solids, mg/l, max | 100 | 600 | 200 |
| 2 | Dissolved solids (inorganic) mg/l, max. | 2100 | 2100 | 2100 |
| 3 | pH value | 5.5 to 9.0 | 5.5 to 9.0 | 5.5 to 9.0 |
| 4 | Ammonical nitrogen (as N), mg/l, max. | 50 | 50 | - |
| 5 | Total Kjeldahl nitrogen (as N), mg/l, max. | 100 | - | - |
| 6 | Biochemical oxygen demand (3 days at 270 C) max.(mg/l) | 30 | 350 | 100 |
| 7 | Chemical oxygen demand, mg/l, max. | 250 | - | - |
| 8 | Arsenic (as As), mg/l, max | 0.2 | 0.2 | 0.2 |
| 9 | Mercury (as Hg), mg/l, max | 0.01 | 0.01 | - |
| 10 | Lead (as Pb), mg/l, max | 0.1 | 1.0 | - |
| 11 | Cadmium (as Cd), mg/l, max | 2.0 | 1.0 | - |
| 12 | Total Chromium (as Cr), mg/l, max. | 2.0 | 2.0 | - |
| 13 | Copper (as Cu), mg/l, max. | 3.0 | 3.0 | - |
| 14 | Zinc (as Zn), mg/l, max. | 5.0 | 15 | - |
| 15 | Nickel (as Ni), mg/l, max | 3.0 | 3.0 | - |
| 16 | Cyanide (as CN), mg/l, max. | 0.2 | 2.0 | 0.2 |
| 17 | Chloride (as Cl), mg/l, max. | 1000 | 1000 | 600 |
| 18 | Fluoride (as F), mg/l, max | 2.0 | 1.5 | - |
| 19 | Phenolic compounds (as C6H5OH) mg/l, max. | 1.0 | 5.0 | - |



Scanned by CamScanner

टिप :-

प्रक्रिया केलेला निचरा जमिनीवरील पाण्यात सोडताना सोडण्यात आलेल्या निचऱ्याचे प्रमाण आणि ज्या उपलब्ध पाण्यात ते सोडण्यात आले आहे त्याचे प्रमाण या बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा.

क) भस्मीकरणाची प्रमाणके :- (standards for incineration)

कचरा जाळण्याच्या भट्टीतून होणारे उत्सर्जन/घनकचरा प्रक्रियेसाठी व विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणारे औष्णिक तंत्रज्ञान या बाबतीत खालील निकषांची पूर्तता होणे गरजेचे आहे.

| Parameter | | Emission Standard |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| Particulates | 50 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |
| HCl | 50 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |
| SO2 | 200 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |
| CO | 100 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |
| | 50 mg/Nm3 | Standard refers to daily average value |
| Total Organic Carbon | 20 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |
| HF | 4 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |
| NOx (NO and NO2 expressed as NO2 | 400 mg/Nm3 | Standard refers to half hourly average value |



| | | |
|---|---|---|
| Total dioxins and | 0.1 ng TEQ/Nm3 | Standard refers to 6-8 hours sampling. furans Please refer guidelies for 17 concerned congeners for toxic equivalence values to arrive at total toxic equivalence. |
| Cd + Th + their | 0.05 mg/Nm3 | Standard refers to sampling time anywhere compounds between 30 minutes and 8 hours. |
| Hg and its compounds | 0.05 mg/Nm3 | Standard refers to sampling time anywhere between 30 minutes and 8 hours. |
| Sb+As+Pb+Cr+ | 0.5 mg/Nm3 | Standard refers to sampling time anywhere |
| Co+Cu+Mn+Ni+ | | between 30 minutes and 8 hours. |
| V+their compounds | | |

**Note.- All values corrected to 11% oxygen on a dry basis.**



Scanned by CamScanner

**टीप :-**

ए) वरीलप्रमाणे उत्सर्जनाच्या मर्यादा नियंत्रणात ठेवण्यासाठी कचरा जाळणाऱ्या भट्टीमध्ये (Incinerater) प्रदुषण नियंत्रण करणारे उपकरण बसविण्यात यावे अथवा मूळ उपकरणामध्ये आवश्यक फेरबदल करून वापरण्यात यावे.

बी) भट्टीमध्ये कचरा जाळताना कोणत्याही क्लोरीनयुक्त जंतुनाशकांचा वापर करून रासायनिक संस्करण करू नये.

सी) क्लोरीनयुक्त प्लॅस्टिक जाळण्याचे प्रमाण दोन वर्षात हळूहळू कमी करावे.

डी) घातक कचरा (व्यवस्थापन, हाताळणी आणि हद्दीपलीकडील हालचाली) कायदा २००८ नुसार भट्टीतील राखेमध्ये विषारी धातुच्या मिश्रणाचे प्रमाण मर्यादेपेक्षा अधिक असेल तर अशी राख घातक कचरा संस्करण, साठवण आणि विल्हेवाट सुविधा केंद्राकडे पाठवावी.

इ) भट्टीसाठी केवळ LDO, LSHS, डिझेल, बायोगॅस, कोळसा LNG, CNG, RDF आणि बायोगॅस यासारखे इंधन वापरावे.

फ) बाहेर पडणाऱ्या गॅसमधील कार्बनडाय ऑक्साईड ($CO_2$) चे प्रमाण ७ टक्क्यापेक्षा अधिक नसावे.

जी) भट्टीच्या जोड चेंबरची रचना अशी करण्यात यावी की, दुसऱ्या ज्वालाग्रही चेंबरमध्ये कमीत कमी म्हणजे ९५०० सेल्सियस इतके तपमान राहिल आणि त्यामध्ये गॅस २ सेकंदापेक्षा अधिक काळ थांबणार नाही.

एच) भट्टी (ज्वालाग्रही चेंबर) कार्यान्वित करताना त्याचे तपमान, टिकवून ठेवण्याचा वेळ आणि ज्वालांचे प्रमाण असे ठेवावे की, तळाची राख आणि गाळ यामधील ऑरगॅनिक कार्बनचे (TOC) प्रमाण ३ टक्क्यापेक्षा कमी असावे अथवा ज्वलनाची घट एकूण वजनाच्या (Dry weight) ५ टक्क्यापेक्षा कमी असावी.

आय) प्रकल्पाच्या ठिकाणी दुर्गंधी पसरु नये यासाठीच्या उपाययोजना केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या (CPCB) वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार कराव्यात.

येथुन पुढील माहिती व अर्जांसाठी इंग्रजीतील
**Solid Waste Management Rules, 2016**
चा संदर्भ म्हणून उपयोग करावा.



## सप्तपदी सातत्याची

- ✓ कचऱ्याचे १००% निर्मिती ठिकाणीच विलगीकरण
- ✓ कचऱ्याचे संकलन आणि वाहतुकीसाठी अधिक चांगल्या पायाभूत सुविधांची निर्मिती
- ✓ कचऱ्यावर १००% शास्त्रोक्त प्रक्रिया आणि विल्हेवाट
- ✓ 3R ची प्रभावी अंमलबजावणी (Reduce, Reuse, Recycle)
- ✓ ODF+ आणि ODF++ साठी शाश्वत चळवळ
- ✓ नागरिकांचा सक्रिय सहभाग
- ✓ स्वच्छ आणि हरित महाराष्ट्राचे लक्ष्य प्राप्त करणे

Scanned by CamScanner

भारत सरकारचा पुढाकार
स्वच्छ महाराष्ट्र करू साकार

## संकल्प स्वच्छतेचा

- सहभागाचा ठाम निर्धार
- व्यापक लोकसहभाग मिळवणार
- १०० टक्के शौचालयाचाच वापर करण्यासाठी प्रवृत्त करणार
- कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, वाहतूक करणार
- कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करणार
- सांडपाण्यासाठी प्रक्रिया करणार
- स्वच्छ व हरित महाराष्ट्र साकारणार

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

**सप्तपदी : स्वच्छ व हरित महाराष्ट्रासाठी....**



Scanned by CamScanner